ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

फेब्रुवारी २०१०
मूल्य १० रुपये



३१ मार्च १९६४ रोजी केलेला

## मुंबईतील ट्रॅमला अलविदा !

## अभिनव उपक्रम

ठाणे ग्रंथाली वाचकदिनी
‘नोबेलनगरीतील नवलस्वप्ने’
या पुस्तकावर आधारित विज्ञानकथेचे
नाट्यरूप सादरीकरण करताना शालेय विद्यार्थी






‘सोन्याच्या धुराचे ठसके’ या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते ३० जानेवारी रोजी झाले.
प्रकाशनसमयी डॉ. मीना प्रभू, डॉ. व्ही. एन. श्रीखंडे आणि लेखिका डॉ. उज्ज्वला दळवी

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

# ठाणे ग्रंथालीचे उपक्रम



'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने'मधील शोधाची जन्मकथा नाट्यरूपात सादर करताना शालेय विद्यार्थी



'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने' पुस्तकाचे लेखकदांपत्य नंदिनी आणि सुधीर थत्ते नाट्यरूप सादरीकरणाच्या दिवशी हजर होते. त्यांचा सत्कार पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास ओक यांच्या हस्ते करण्यात आला. पाठीमागे दिनकर गांगल



आजच्या विद्यार्थ्यांना अभिजात संगीत आणि उत्कृष्ट शब्दकळा यांचे भान देणाऱ्या 'बालमुखातून गीतरामायण' या उपक्रमात विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. माजिवडा हायस्कूलचे विद्यार्थी गीत सादर करताना.

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**फेब्रुवारी २०१०**
**वर्ष ३० वे, अंक २ रा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

पाचव्या 'जयपूर लिटरेचर फेस्टिव्हल'ची सोमवार २५ जानेवारीला सांगता झाली. आशियातील अनेक मोठमोठ्या लेखकांनी हजेरी लावली. पण अनपेक्षित व्यासपीठावर अवतरली ती डच-सोमाली लेखिका आयान हिरसी अली. संयोजकांनी कार्यक्रमाच्या मांडणीत तिचा कुठेही उल्लेख केला नव्हता. त्याला कारणही तसेच आहे. ते म्हणजे स्त्रीहक्कांसंबंधी तिची इस्लामविरोधी मते.

तिच्या 'सबमिशन' या कथेवर थीओ व्हॅन गॉगने (सुप्रसिद्ध व्हॅन गॉगचा पणतू) दहा मिनिटांची एक लहानशी डॉक्युमेंटरी केली. त्याने एकच गदारोळ उठला आणि त्याचा शेवट थीओच्या हत्येत झाला. ही घटना २००४ मधली. तेव्हापासून तिलाही जीवे मारण्याचा फतवा जारी आहे. याच कारणाने संभाव्य गडबड टाळण्यासाठी आयोजकांनी तिच्या नावाचा कुठेही उल्लेख केला नव्हता. अपेक्षेप्रमाणे तिने तिची चिथावणारी (प्रोव्होकेटिव्ह) मते मांडली. खरे तर, इस्लामी सेन्सॉरशिपचा दरारा सगळ्या जगाने मान्य केलेला आहे. कुठलेही फतवे काढण्याचा आणि हिंसा करण्याचा व्हिसाही उर्वरित जगाने दिला आहे. हे सगळे अमेरिका आणि इस्त्रायल यांच्या धोरणांची प्रतिक्रिया आहे अशी एक भाबडी समजूतही आहे. या पार्श्वभूमीवर आयानच्या या पहिल्यावहिल्या भारतीय दौऱ्याबद्दल आणि जयपूरमधील तिच्या मुलाखतीवर खळबळजनक प्रतिक्रिया उमटणार अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात असे काहीच घडले नाही. कदाचित जयपूर लिटरेचर फेस्टिव्हल अशा एका एलिट जमातीत घडतो की त्याचा वारासुद्धा इतरांना लागत नाही.

याविरुद्ध कथा गेल्या आठवड्यात प्रदर्शित झालेल्या सलमान खानच्या 'वीर' सिनेमाची. ब्रिटिशकाळातील एका राजपूत 'वीर'ची ही व्यावसायिक कथा. आता याला काही राजपूत संघटनांचा विरोध, तोही तोडफोड करण्यापर्यंत का असावा हा प्रश्न निर्माता अनिल शर्माला पडला. कारण फार उद्बोधक होते. या सिनेमात 'वीर' एका ब्रिटिश युवतीच्या प्रेमात पडतो. म्हणजे राजपुतात त्याच्या योग्यतेची कुणी मुलगीच नव्हती? हा राजपुतांचा आणि राजपूत स्त्रियांचा अपमान! आणि भावना दुखावणं वगैरे वगैरे....!

या दोन टोकांमध्ये आहेत स्वयंघोषित सेन्सॉरशिपच्या भावना दुखावण्याच्या वेगवेगळ्या छटा. कदाचित दिल्लीपासून ग्रामपंचायतीपर्यंत होणाऱ्या सत्तेच्या विकेंद्रीकरणाबरोबरच हे सेन्सारशिपचेही विकेंद्रीकरण नैसर्गिक असेल.

जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या पार्श्वभूमीवर आणि टीव्ही, इंटरनेटच्या झपाट्याने होणाऱ्या प्रसारामुळे एक विचार असा होता, की कलाकृतींचा रसास्वाद सामूहिक न राहता व्यक्तिगत होईल. आपण कुठला साबण किंवा टूथपेस्ट वापरतो ही वैयक्तिक गोष्ट असते. तिच्यावर आपण चर्चा किंवा वाद घालत नाही. कलेचेही, मग ते नाटक, सिनेमा किंवा पुस्तक काहीही असो, असेच उपभोग्य वस्तुकरण होईल असा अंदाज होता. पण टीव्हीच्या या जगात राजकीय अराजकीय संघटनांना या कलाकृती म्हणजे एक आयते साधन मिळेल हे तेवढे ध्यानात नव्हते आले. काही वेळा आपले अस्तित्व टिकवण्यासाठी, प्रभाव वाढवण्यासाठी किंवा आपापल्या सहानुभूतीदारांना 'आम्ही तुमचे हितसंबंध जपतोय' हा मेसेज पोचवण्याचे बिनखर्चाचे साधन अन्य कुठले मिळणार? त्या अर्थाने कलेचे प्रॉडक्टायझेशन झालेय असे म्हणायला हरकत नाही.

**– संपादक**

# मुंबईची ट्रॅम



मुंबईतील शेवटच्या ट्रॅमला निरोप देताना
(३१ मार्च १९६४) भावना उचंबळून आलेला जनसमुदाय

बॉम्बे ट्रॅमवे कंपनीची स्थापना १८७३ साली झाली. बॉम्बे ट्रॅमवेज् अ‍ॅक्ट १८७४ साली अस्तित्वात आला. सध्या मुंबईत काम चालू असलेली मेट्रो रेल्वे आणि मोनोरेल यांच्यासाठी जमीन संपादन, अन्य कामे आदींसाठी याच कायद्याचा वापर करण्यात आला आहे.

आरंभीच्या ट्रॅम दोन प्रकारच्या होत्या. एका घोड्याने ओढलेल्या आणि दोन घोडे ओढत असणाऱ्या. कंपनी १९०५ साली बंद झाली तेव्हा तिच्याकडे १३६० घोडे होते. पहिली ट्रॅमसेवा क्रॉफर्ड मार्केटमार्गे कुलाबा ते पायधुणी अशी होती. दुसरी होती बोरीबंदर ते पायधुणी काळबादेवीमार्गे. आरंभी भाडे तीन आणे होते. नंतर ते दोन आणे आणि अखेर १८९९ मध्ये एक आणा करण्यात आले.

ट्रॅमला आरंभी अनेकांचा विरोध होता. टांगे आणि इतर घोडागाड्या नामशेष होतील असा त्यांचा आक्षेप होता. दादोबा पांडुरंग तर्खडकर अशा विरोधकांचे अध्वर्यु होते. अर्थातच या विरोधाचा अपेक्षित असलेलाच शेवट झाला. मुंबई महापालिकेने १९०५ साली कंपनी ताब्यात घेतली. अशा प्रकारे हा उपक्रम 'बेस्ट'च्या अखत्यारित आला.

विजेवर चालणाऱ्या ट्रॅम गाड्यांचे स्वागत मुंबईकरांनी उत्साहाने केले. पहिली विजेवर चालणारी ट्रॅम ७ मे, १९०७ रोजी धावली. तिचे उद्‌घाटन नगरपालिकेचे तत्कालीन अध्यक्ष वल्लभदास ठाकरसी यांनी केले. ही ट्रॅम लंडन येथील ब्रश इलेक्ट्रिक कंपनी यांनी बांधली होती. कुलाबा ते बोरीबंदर असा तिचा मार्ग होता. मात्र लवकरच अतिगर्दीची समस्या ट्रॅम सेवेला भेडसावू लागली. दुमजली ट्रॅमसेवा १९२० साली सुरू करण्यात आली. मुंबईची ट्रॅम सेवा लंडनच्या धर्तीवर स्थापन करण्यात आली आणि चालविण्यातही आली. भारत स्वतंत्र झाल्यावर मुंबईच्या ट्रॅम सेवेच्या गुणदोषांवर चर्चा सुरू झाली. मुंबईची वाढती गरज भागवण्यास ट्रॅम असमर्थ ठरत असल्याचे तोपर्यंत स्पष्ट झाले होते. ट्रॅम कंपनीचा तोटाही दिवसेंदिवस वाढत चालला होता.

ट्रॅम सेवेचे एक सर्वेक्षण १९५२ साली करण्यात आले. त्यानंतर ही सेवा अखेरच्या घटका मोजू लागली. एकामागून एक मार्ग बंद करण्यात येऊ लागले. त्या मार्गावर बस सेवा सुरू करण्यात आली. अखेरचा मार्ग उरला तो बोरीबंदर – दादर दरम्यानचा.

शेवटची ट्रॅम धावली या मार्गावर ३१ मार्च १९६४ रोजी. बोरीबंदरहून सुटलेली ही ट्रॅम खच्चून भरली होती. रात्री दहा वाजता ती रवाना झाली तेव्हा अनेकांचे डोळे पाणावलेले होते. 'बेस्ट'चे महाव्यवस्थापक बी.जी. घाटे कंडक्टरच्या भूमिकेत स्वत: तिकीटे देत होते. अखेर मध्यरात्री ९० वर्षांची ट्रॅमसेवा इतिहासात विलीन झाली.

(गिरगावातील ट्रॅम सेवा बंद झाली त्यावेळी मं.वि. राजाध्यक्ष यांचा लेख प्रसिद्ध झाला होता. १९५९ साली प्रसिद्ध झालेला हा लेख पुन:प्रसिद्ध करत आहोत.)

# गिरगावातील शेवटची ट्रॅम...

## मं.वि.राजाध्यक्ष

'जिथे मारते कांदेवाडी, टांग जराशी ठाकुरद्वारा', त्या नाक्यापाशीच माझी बहुतेक जाणती हयात गेली. खुणा सांगून आमचे घर काही तुम्हाला ओळखू येणार नाही. आजूबाजूच्या घरांसारखेच आहे ते. तिमजली, कललेल्या गॅलरीचे, लाकडी कठड्यांचे; दर्शनी भाग काळवंडून गेलेला, पाठीकडून शेवाळलेले. खालच्या मजल्यावर तीन-चार क्षुद्र दुकाने. एक 'क्षुधा-शांति-गृह'. क्षुधेचे नवे थेर तेथे चालत नाहीत. सामोसा हा 'माँव्साचा'च पदार्थ अशी मालकाची, म्हणजे सोमणांची, श्रद्धा. बुंदीचे आणि रव्याचे लाडू, चिवडा, शंकरपाळे, चकल्या, शेव, असले काचेच्या बरण्यांत मुरलेले घरंदाज खाणे हे तेथले खास. (गुरुवार सोडून) कांद्याची भजी, वांगीपोहे आणि उपासाच्या दिवशी साबुदाण्याची खिचडी व शेंगदाण्याची उसळ; आणि रविवारी सकाळी मिसळह्नतो तेथील सर्वांत चटोर पदार्थ. (त्याची तारीफ गिरगावात फार जुनी आहे. म्हणून हल्ली रविवारी सकाळी पोरीही येतात. नाइलाजाने मालक त्यांना आत घेतो.) दुसरे दुकान दूधवाल्या सरजू भैय्याचे, बिनपाटीचे; दोन पिढ्यांनी त्याच कढईत दूध उकळले. सूरजपेक्षा आमची प्रभी (कोविद) अधिक फर्मास हिंदी बोलते; म्हणून तिला कौतुकाने तो दुधाची धार अधिक घालतो. त्याचे दही अडीअडचणीला ('अमंगळ असले तरी') भोवतालच्या गृहिणीच्या उपयोगी येते, आणि गुरुवारच्या दत्तापुरते तो पेढे ठेवतो. त्यानंतर नाना बोडसाचे 'श्री पर्शराम मार्ट'- ती अक्षरे आमच्या स्मरणात स्पष्ट आहेत, पाटीवरून केव्हाच उडून गेली. पाट्या, पेन्सिली, वह्या, अंकलिपी, पेपरमिंट, पंचांग, जानवीजोड, उदबत्त्या, कापूर, सुताची रिळे, बटणे यासारखी त्यांची रुटूखुटू विक्री. त्यातच पायरीशी एका माळणीची सोय केलेली... नानांचे आणि सूरजचे बिऱ्हाड दुकानाच्या मागील अर्ध्या भागात...

वरच्या मजल्यावरील बिऱ्हाडे त्याच सुरातली. बहुतेक सगळे कारकून - कोणी लहान, कोणी मोठे. एकदोन कारकून-मुलीही आहेत. पण त्या 'तशा' न दिसण्याचा प्रयत्न करतात; फार तर, मराठी शाळा-मास्तरणीइतपत दिसतात. चाळीचे वळण राखत आहे, आणि पुन्हा कोणी 'पसंत आहे' म्हणताच अशाच एखाद्या चाळीत संसाराला लागायचे आहे हे त्यांना पुरेपूर ठाऊक आहे. त्या दोघींतली एक तर बायकांच्या विद्यापीठाची पदवीधर आहे! पुरुषांपैकी चांगले तिघेचौघे पदवीधर आहेत; पण आता त्यांच्या बायका सोडल्यास, त्याचे कोणाला कौतुक? तीसएक वर्षांपूर्वी बापटांचा पुरुषोत्तम बी.ए. झाला त्यावेळची खळबळ चांगली महिनाभर टिकली; पुढे पुरुषोत्तमाने वेगळे बिऱ्हाड केले ते नटव्या बायकोच्या नादी लागून!... असो. त्यानंतर पाचसात वर्षांनी अभ्यंकरांची द्वारकी मॅट्रिक झाली. तेव्हाही थोडीफार खळबळ झाली. पण ती सर्वस्वी कौतुकाची नव्हती!... आता मुलींच्या मॅट्रिकची महती उरली नाही; तेव्हा होती. एकोणिसशे चाळीस ते पन्नास या काळात समाजात फार झपाट्याने बदल झाला म्हणतात; पण आमच्या चाळीत फारसा घडला नाही खरा. धोतराऐवजी पायजमे, तुमानी कोटाऐवजी बुशकोट, आणि नऊवारीऐवजी पाचवारी कुमारिका दिसू लागल्या; कोठे केशरचनेबाबत जरा फेरफार झाले असतील, पण ते वरवरचे. अजून दुपार सोडल्यास बायकांचा वावर मागील दारानेच अधिक; संध्याकाळनंतर त्यांचे आवाज सहसा ऐकू यायचे नाहीत. लिमयांच्या सुमीचा गळा खरोखरच गोड; आणि एकदा ऐकले की गाणे सहीसही उचलते पोरगी. पण 'पुरुषमंडळी घरात असता' तिला म्हणायला लावायचे म्हणजे कोण प्रयास; आणि म्हटलेच तरी दबल्या सुराने. आणि तेही हिंदी गाणे नव्हे; मराठीच. एकोणिसशे एकोणसाठ साली हे तुम्हाला खरे नाही वाटणार; पण असते एकेका घराची प्रकृती, वस्तीचा गुण नाही. आमच्या समोरच्या 'नील-प्रभा मॅन्शन'मध्ये (पूर्वीची देवरुखकरांची चाळ; आता मालक आणि नाव बदलले). गाळ्यागाळ्यात लता आणि आशा असाव्यात; चोवीस तास 'सिलोन रेडिओ' चालू असल्याचा रस्त्यापलीकडेही भास होतो...

या प्रकृतीशी ज्यांचे पटले नाही त्यांनी पाय काढला. कसल्या कसल्या सबबी निघाल्या; वाढत्या संसाराची तर पुन्हा पुन्हा. कुटुंबातल्या धुसफुशी होत्याच; पण त्या नसतात कुठे? पण माणसाचे घराशी जमले नाही की तुटले हेच खरे. घर वाकले नाही; नव्या थेरांना त्याने हुसकले. दाराखिडक्यांना पडदे लावण्यापासून ते घरात अंडी आणण्यापर्यंतच्या लहानमोठ्या नावीन्यांपर्यंत. दारांवरून आठवले. रात्री निजानीज होईपर्यंत दारे सताड उघडी. एरव्ही ते बंद ठेवण्याच्या 'साहेबीपणा' कोणी करून पाहिला; पण धकला नाही. दाराची

खीळ बेटी दिवसा लावली तरी लागत नसे! ‘‘ब्लाकांत राहायला जा म्हणावं’’; म्हणजे कोणी कडवा विरोध करीत असे, असे नव्हे; पण घराचे वातावरण आंबायचे; गुदमरल्यासारखे होऊन कोणीतरी बाहेर पडायचा. पुन्हा दारे मोकळी, आणि घर ताठ.

– तसे घर अगदीच मठ्ठ होते असे नाही. पाहुण्याला चहा द्यायच्या स्टुलावर जाळीचा रुमाल आला, किंवा पोलादी कपाट आले, किंवा स्टेनलेसच्या ताटह्नवाट्या आल्या, तर त्याने गैर मानले नाही; निदान काणाडोळा केला. शेंबवणेकरांनी गतवर्षी ‘ट्यूब लाइट’ बसवून घेतला; तेही खपून गेले. थोडी शोभा चालायचीच... रामदास आणि टिळक यांच्या जोडीला आता गांधी अथवा नेहरू अथवा गौतम बुद्ध यांची चित्रेही एकदोन बिऱ्हाडांत आली, आणि टिकली.

बहुतेक बिऱ्हाडे वडिलार्जित; दहांपैकी आठ-नऊंची आडनावे वर्षानुवर्षे तीच राहिली आहेत. एखादा मुलगा उसळून बाहेर पडो, उरलेले कुटुंब तेथेच राहिले. कुटुंबांचे जागेशी घट्ट लागेबांधे. आमचेच पाहा. आजोबा म्युनिसिपालिटीत; मागून वडील. कामही ‘डी’ वार्डातच. काका रेल्वेच्या नोकरीचे निमित्त काढून बाहेर पडले. आम्ही पोरबुद्धीने कधी वडलांना म्हणावे, ‘‘दादा, आता ही जागा सोडून चांगली मोठी जागा घेऊ या कुठंतरी. दादरला छान आहेत, आणि स्वस्तही आहेत...’’ (पस्तीस सालचे हे). पण व्यर्थ! ‘‘दादरला?’’ असे खोचकपणे विचारताना दादांच्या चेहऱ्यावर भाव असा की जणू दादर कुठं ठाण्याच्या खाडीपार आहे. ‘‘मी इथंच राहणार. उद्या तुम्ही शहाणे झालात आणि पैसे फार झाले की जा दादरला. नाही तर... नाही तर अगदी अंधेरीला तडफडा !’’ दादांचा भूगोलच बंदिस्त. रिटायर झाले, चार पैसे गाठीशी आले तरी चाळीशी घट्ट. म्हणत कसे, ‘‘ तुझं काय वाईट झालं इथं? लागतं ते सगळं जिना उतरला की मिळतं. सिनेमेदेखील दोन आहेत जवळ. पुन्हा दारात




ट्रॅम टिकीट एक आणा!

ट्रॅम’’ – तेही खरेच. त्यांचे स्नेही याच भागात; फणसवाडीतले आबा रिसबूड म्हणजे सर्वांत दूरचे; अधूनमधून एखाद्या रविवारी त्यांच्याकडे सातहातीचे किंवा झब्बूचे चार डाव टाकायचे. कधीकाळी सभा वगैरे असली तर चर्नीरोडवरील ब्राह्मणसभेत. कांदेवाडीतील गणपती-उत्सव असतोच, आणखी जवळपास एकदोन. त्यांना तसा देवाचा नाद, पण ‘‘भटवाडीच्या दोन देवळांपासून ते ठाकूरद्वारच्या काळ्या रामापर्यंत सगळे देव आहेत आपल्यासाठी’’ आणि मग ते (न चुकता हसून) म्हणत, ‘‘तोच आपला धार्मिक वॉर्ड.’’ अशी त्यांची निष्ठा. चार वर्षांखालीच गेले ते. ‘‘सोनापूरही जवळच’’, असे ते कधी कधी म्हणत त्याची आठवण भडभडून आली तेव्हा.

जे दादांचे तेच कानामात्रेच्या फरकाने शेजारच्या तात्यांचे आणि दाजींचे आणि वामनरावांचे आणि चिंतोपंतांचे. घर आणि कचेरी यांमध्ये आखलेल्या मार्गावरून नाकासमोर जायचे, यायचे; इतर गोष्टींशी, कर्तव्य नाही. कसल्या उचापती नाहीत, भलती हाक नाही. ‘सुप्रिटेण’ होणे ही एकुलती एक महत्त्वाकांक्षा; चार पोरेबाळे होऊन पोरींना स्थळे मिळावीत आणि पोरगे नोकरीला चिकटावेत ही सांसारिक योजना. कोकणातल्या गावी वर्षाआड जाता आले, आणि येताना थोडी आंब्याची साठे आणि काजूगर आणि आमसुले आणता आली तर घरातल्या कुळाचारांप्रमाणेच वाडवडलांशी निष्ठा ठेवल्याचे समाधान. तेवढाच देहाला प्रवास. फार तर कोणी कधीकाळी पंढरपूरची यात्रा केलेली असते; किंवा कोणाला पुण्यानाशकाला ‘‘अगदी घरातलंच कार्य उभं राहिलं’’ म्हणून नाइलाजाने जावे लागलेले असते. एरव्ही परप्रांत म्हणजे परदेशासारखा. ओरिसा काय नि ऑस्ट्रिया काय, इतिहासाच्या पुस्तकातल्या कसल्या ‘मुसलमानी’ वंशावळयांसारख्या या भूगोलातल्या नामावळ्या. खरे म्हणजे, परप्रांत सोडाच, देशावरची गावे तेवढीच परकी. इतकेच की तेथून कोठूनतरी-साताऱ्याहून, नाहीतर सांगलीहून-एखाद्या घरात कधी पत्र येते. ‘नागपूर-वऱ्हाडकडे’ कोणाचा तरी ‘दूरचा’ नातेवाईक असतो. वामनराव पोष्टात नोकरीला; त्यांच्या हाताला मात्र ‘कुठकुठल्या गावांचा’ सराव झालेला. पाय मात्र सगळ्यांचे येथेच रोवलेले; आणि मनेही. उगाच पसारा नको, वेग नको; तो सगळा चवचालपणा. दाजींचा एक ‘उनाड’ चुलत मेव्हणा कसल्याशा कंपनीचा फिरता एजंट आहे. तो कधी येतो आणि पोरांना डेक्कन क्वीन, फ्रंटिअर मेल, फ्लाइंग राणी, ग्रँड ट्रंक असल्या नावांनी थक्क करतो. दाजींना मात्र कसेसेच होते. ऑफिसातला तो फाजील होर्मसजी ‘टिफिन’च्या वेळी मुद्दाम कटलेट, चिकन् फ्राय, खिमा, ऑम्लेट, असली संध्या केल्यासारखी नावे घेतो तेव्हा होते तसेच...

मुंबईतल्या मुंबईतही तेच. जुन्या शहराने घासाघासाने नवी उपनगरे पचवली, माणसांचे लोट येऊन महामुंबई अफाट पसरली. पण आमचे हे बेट तसेच राहिले; भोवतालच्या नवरंगांपासून अलग, पाय पोटाशी घेऊन संपर्क टाळणारे. वाणी, शिंपी, कापडवाले, कोळसेवाले, न्हावी तेच; पिढीला पिढी. वाहन लागलेच तर शक्य तोवर ट्रॅम किंवा व्हिक्टोरिया. आता पिवळ्या चुणचुणीत टॅक्सींचा इतका सुळसुळात झाला; त्याही तुमच्या मंद आणि खिळखिळीत व्हिक्टोरियाहून स्वस्त. पण

नाही. या चाळीबाहेर टॅक्सी उभी राहिलीच तरी ती सहसा कोणा चाळकऱ्यासाठी नव्हे. का कोण जाणे, तो छचोर भपका वाटे. तात्यांना एकदा ऑफिसातच खूप ताप भरला म्हणून खुद्द त्यांच्या साहेबाने टॅक्सी बोलावली; पण तात्या उतरले जरा अलीकडेच, गिरगाव रोडवर. तेथून ते कसेबसे, झुकांड्या खात, घरापर्यंत आले. आगगाडीसुद्धा नकोच. तात्यांचे ऑफिस चर्चगेटजवळ-वडीलही (बापू म्हणत त्यांना) तेथेच नोकरी करीत; आगगाडीने जात-येत. तीस वर्षांपूर्वी विजेच्या गाड्या आल्या; एका आठवड्यातच बापूंनी सांगून टाकले, ''या महिन्याचा पास संपला की आगगाडी बंद; महाग पडली तरी ट्रॅम बरी.'' कारण म्हणे या विजेच्या गाड्या एकदम सुटतात; लौकर वेग घेतात. असे बापू हादरले. ऑफिसमध्ये कोणी म्हटले, ''बापू, ट्रॅमसुद्धा त्याच विजेवर चालते ना तुमची?'' बापूंचे उत्तर :'' आपल्याला काय माहीत? आमची ही ट्रॅमची वीज संथ आहे, घायकुतीची नाही. आणि आपल्याला कुठं घाई आहे? पाच मिनिटं लौकर बसू जेवायला.'' बापूंच्या ऑफिसातील सहकाऱ्यांना हा चेष्टेचा विषय होता. पण चाळीला ते पटले. कोट-विभाग हीच कारकुनांची मक्का; त्या दैनिक वारीला ट्रॅमसारखे निवांत वाहन नाही अशी चाळीची धारणा. पुढे बसगाड्या धावू लागल्या तरी ती डगमगली नाही; त्यांचे दरही चढे, आणि चिंतोपंत म्हणत त्याप्रमाणे, ''तीही मोटारच; टॅक्सीची - अक्का!'' ट्रॅमने एक किंवा फार तर दीड आण्यात कोठेही जाता येई; अगदी कालपर्यंत 'चेंज' तिकिटे मिळत; कोठे 'चेंज' घ्यायची हे व्यवहारज्ञान नव्याने प्रवास करणाऱ्या चाळकऱ्याला समजावून सांगितले जाई. बोरीबंदरचा द्राविडी वळसा टाळून सरळसोट 'फाउंटन'ला जाणारी आठ नंबर म्हणजे ''त्यापुढं तुमची ती मेल गाडी झक मारते.'' तिच्याविषयी शिळोप्याला बोलत, तिच्यासाठी सकाळी ऑपेरा हाऊसपर्यंत पायपीट करीत. बायकामुलांनाही तिचे



घोडे असलेली ट्रॅम - १८७४

माहात्म्य ठाऊक होते; आवर्जून ती एकमेकांना दाखवीत. तीनचार वर्षांपूर्वी तो मार्गच उखडून टाकला तेव्हा आमच्या घराला केवढा धक्का बसला. महिनाभर आम्ही त्याविषयी बोलत असू. गिरगावकरांची सोय जाणून कॉर्पोरेशनने त्याच मार्गावर आणि सवलतीच्या एक आण्याच्या दरात 'के' बस सुरू केली, पण आमच्यासारख्यांची भावना जाणली नाही. आम्ही ट्रॅमसाठी ताटकळलो, बोरीबंदरचे अपराध केले आणि अशी वेळेची खराबी केली; पण निष्ठा सोडली नाही. म्हणजे निदान बहुतेकांनी. तसा एखाददुसरा 'क्रियानष्ट' असेल...

मला आठवते, आम्ही लहान होतो तेव्हा गावची-म्हणजे आमच्या गुहागरची-कुणी पाहुणी मुले आली-किंवा शेजाऱ्यांकडे आणखी कुठची-की, तासन् तास आम्ही गॅलरीत उभे राहून ट्रॅमगाड्यांची मोजदाद करीत असू. 'सहा नंबर' आणि 'आठ नंबर' यांतला फरक, कंडक्टरपाशी तिकीट कसे मागायचे, वरचा दांडा मागेपुढे कसा करतात, तिकीटाला भोक का पाडतात, बायकांसाठी कोणती बाके, असले ज्ञान आम्ही चाळकरी मुले असे धाडधाड बोलून दाखवीत असू की बिचारे पाहुणे तोंड वासून ऐकत, आणि गावी परतल्यावर येथील सोबत्यांपुढे त्याची उजळणी करीत. मला आठवते, कधी जवळपास कोणी मोठे माणूस असले तर ते आमची चूक दुरुस्त करी; अथवा आणखी गहन तपशील सांगे. चिंतोपंतांना तो उत्साह मोठा. आपण हुशारीने 'चेंज' तिकीट घेऊन दोनतीन कामे एका आण्याच्या प्रवासात कशी उरकतो हे ते पुन्हा पुन्हा सांगत. तेच कशाला, करंदीकरांच्या रमाकाकूंना कसलासा 'लाइट' घेण्यासाठी मधूनमधून परळच्या इस्पितळात जावे लागे; त्याही आमच्यात लुडबुडत. आपण 'कडंक्टराची' नाही तर 'डायव्हरची' कशी 'खरडपट्टी काढली' ते रंगून सांगत. आम्हालाही आवडे ते ऐकायला; कारण एवढे ट्रॅमचे सोडले तर रमाकाकू आमचीही खरडच जास्ती काढत.

असे आम्ही ट्रॅमचे आवाज कानात ठेवून वाढलो. पावणेपाचच्या सुमारास पहिल्या ट्रॅमच्या ठणठणाटाने घराला जाग येई. पूर्वी रात्री नवाला दोनतीन मिनिटे कमी असताना शेवटची 'आठ नंबर' कोटाकडे जाई; पोराबाळांना अंथरुणात पडायचा तो इशारा असे. तासाभरात मोठी माणसेही गप्पा आणि इतर उद्योग आवरून घेत; पण कोठे काही लांबले किंवा झोप येईना म्हणून




मुंबईतील पहिली इलेक्ट्रिक ट्रॅम

पडल्यापडल्या खुसखुस चालली तरी साडेबाराच्या शेवटच्या ट्रॅमनंतर सामसूम व्हायचीच. आता घराला निश्चल आणि गाढ झोप लागायची.

...आणि घराची झोप उडाली ती त्या वार्तेने. कोणीकोणी धीर दिला की अशा भुमका मधूनमधून उठतातच. त्यांच्याकडे फार लक्ष देऊ नये. पण असल्या बातम्या खऱ्या ठरायच्याच! एके दिवशी सकाळी वर्तमानपत्रात छापूनच आले-अगदी अधिकृत वृत्त म्हणून-की एक ऑक्टोबरपासून गिरगावच्या ट्रॅम बंद...

त्या शेवटच्या पंधरावीस दिवसांत घर कावरेबावरे झाले होते. जाणाऱ्यायेणाऱ्या प्रत्येक ट्रॅमकडे वाकवाकून डोळे भरून पाही आणि पूर्वीपेक्षाही अधिक गदगदा हाले. आता पूर्वीची दुश्चिन्हे आठवू लागली. 'आठ नंबर' तशी गेली. सँढर्स्ट रोडचीही गेली; आणि कालपरवा कुलाब्याची आटपली. तेव्हा आम्ही थोडे चरकलो होतो. पण ते एवढेचे तुकडे छाटले गेले; हा गिरगावचा म्हणजे ट्रॅमचा राजमार्ग; त्याच्यावर घाला येईल असे कसे वाटेल?

आता ती ट्रॅम शेवटचे दिवस मोजत होती, खरे म्हणजे आम्ही मोजत होतो... शेवटी-शेवटी तर तास. आमच्या चाळीत मुलांच्या हाती शाळेची फी आणि बारीकसारीक खरेदी याशिवाय पैसा देण्याची रीत नाही; पण आता बिऱ्हाडाबिऱ्हाडातून ती मोडली. "जा रे, फिरून या ट्राममधून. मजा करून घ्या." दोनतीन पोरे तर माटुंग्यापर्यंत जाऊन आली. पोरांचेच कशाला? बहुतेक राव आणि पंत चारदोन अकारण फेऱ्या मारून आले. माझेच घ्या. मी त्या शेवटच्या रविवारी सकाळी दादरपर्यंत गेलो; संध्याकाळी कोटात. अर्थात काहीतरी निमित्त होतेच... पण कोणी कोणाला निमित्त विचारीत नव्हता-बायकासुद्धा. अगदी शाळकरी विमल-कमलपासून ते वाकलेल्या आजीबाईंपर्यंत. करंदीकरांच्या रमाकाकूंनी तेवढ्यात पुन्हा 'लाइट' सुरू केला-एक दिवसाआड परळला जाऊन येत. आमची ही इतकी व्यवहारी; पण एकोणतीस तारखेला प्रार्थनासमाजाजवळ कायसेसे आण्याभराने स्वस्त पडते म्हणून तेवढ्यासाठी ट्रॅमने गेली...

बुधवारी सप्टेंबरची तीस तारीख. त्या दिवशी घराची काय घालमेल झाली असेल तुम्हीच कल्पना करा. कोणाचे चित्त ठिकाणावर नव्हते. संध्याकाळी आम्ही जड पावलाने ट्रॅममधून उतरलो; आणि ती पुढे गेल्यावर वळून वळून तिच्याकडे पाहत होतो. दुपारभर साऱ्या बायका कसली कसली कामे काढून बाहेर गॅलरीतच होत्या आणि संध्याकाळी 'पुरुष घरी आल्यावर' देखील कधी नव्हे त्या आतबाहेर करीत होत्या. मुलेही घोळक्यांनी शेवटची फेरी मारून आली.

...रात्रीची जेवणे कशीबशी चिवडून पुन्हा माणसे बाहेर आली. पुरुष आणि मुले बाहेर, वयस्क स्त्रियाही. इतर स्त्रिया उंबरठ्याशी बसल्या. तान्ही मुले सोडल्यास सगळे जागत होते... जुन्या जुन्या आठवणी निघाल्या... तो लांब मिश्यांचा धिप्पाड भैया ड्रायव्हर-"बस पुढे जाऊ द्यायचा नाही"... दुसरा तो पोरगेलासा; पायाखालची घंटा तालात वाजवायचा... आणि कोणी 'गमत्या कंडक्टर'... मुलेही मोठ्यांसारखी बोलत होती-त्यांच्या चिमुकल्या आठवणी, त्यांत काही ऐकलेले, काही मनचे, अशी भर... मध्येच बोलणे खुंटे. दोन मिनिटे स्तब्ध. पुन्हा कोणीतरी सुरू करी.

घटका भरत आली. ज्याच्याज्याच्याकडे मनगटी घड्याळ होते त्याने त्याने ते लावले; इतर भिंतीवरचे घड्याळ दिसेल अशा बेताने पुंजके करून बसले होते... आता एकच ट्रॅम राहिली, शेवटची; साडेबाराची. हळुहळू, जणू नकळत एकएकजण उभा राहिला... अरे! पण साडेबारा होऊन गेले-वर पांच मिनिटे व्हायला आली... की शेवटची ट्रॅमही रद्द केली या लोकांनी?... सगळे कावरेबावरे झाले!-म्हणजे मघा गेली तीच शेवटची? आपल्या बोलण्याच्या नादात नीट पाहिलेही नाही तिच्याकडे! एकदोन पोरे धडपडत खाली गेली-आज त्यांना कोणी मना केले नाही. त्या पोरांनी तिकडून अर्धवट ओरडून, अर्धवट खुणेने, सांगितले, "आली!" जो तो कठड्याला भिडला - पुरुष-स्त्री पाहिले

नाही; हे अघटितच. सगळे घर श्वास रोखून क्षणभर पुढे कलले... ट्रॅम दिसेपर्यंत ती येत असल्याचे कळले नाही. तिच्या आवाजावरही आतील उतारूंचे आणि रस्त्यावरच्या लोकांचे आवाज चढले होते. खोटे वाटेल, पण आमच्यापैकी दोघेतिघे मोठ्याने ओरडले...आमच्या हिला त्याचे हसू आले.

या वेळी म्हणजे ट्रॅम सुसाट जायची. आज अडखळत गेली, निदान गेल्यासारखी भासली. खरे सांगू, नीट काही दिसलेच नाही. तिकडे पाहू की आजूबाजूच्या माणसांकडे पाहू असे झाले होते... नीटसे कोठे पाहिलेच नाही– इतकेच आठवते, की खूपसे लोक होते, कसला तरी घोष करीत होते, काही जण ट्रॅमच्या पायऱ्यांवर उभे होते, ट्रॅम चालवण्याच्या पितळी दांड्यावर हार होता.

इतक्या सावकाशीने ट्रॅम गेली तरी घर हादरलेच–एक वेळी दोन ट्रॅमगाड्या आणि चार बस जाऊन हादरणार नाही असे.

चकाकत्या रुळांकडे पाहत चारपाच मिनिटे आम्ही स्तब्धपणे उभे होतो... कोणीतरी घाईने करड्या आवाजात मुलांना झोपायला येण्यास बोलावले...लोक पांगले... सामसूम झाली.

इतरांचे कोण जाणे, मला किती वेळ झोप येईना. आली ती अडखळत, फरफटत. मधून–मधून ट्रॅमच्या खणखणाटाने जाग येई. घर शिरशिरल्यासारखे होई. वेडगळ स्वप्नांचे तुकडे सरकत... मीच खाकी वेष चढवून, पोटऱ्यांवर खाकी पट्टी बांधून, भलामोठा चढाव घालून जोराजोराने घंटा वाजवीत आहे आणि उलटसुलट जाते फिरवल्यासारखे ते पिवळेधमक दांडे डाव्याउजव्या हातांनी वेगाने फिरवीत ट्रॅम दौडावीत आहे आणि तिकिटांना भोके पाडून उतारूंना देत आहे आणि मधूनच वरचा दांडा मागचा पुढे करून ठेवीत आहे.

पहाटे पावसाची केवढी सर आली; अर्ध्या झोपेलाही हे कळले... आणि तिने पांघरुणात गुरफटून घेतले.

शेवटी जाग आली तेव्हा चांगले सात वाजून गेले होते... असे कधी झाले नव्हते... भोवतीही विशेष हालचाल नव्हती; असल्यास न बोलता... मी कठड्याशी उभा राहिलो; आणखीही एकदोघे होते कोणीतरी. त्या कुंद हवेत रूळ उठून दिसत होते. पाऊस केव्हाच पडून गेला तरी अजून घराच्या पागोळ्यांवरून मोठमोठे थेंब पडत होते.

**('साहित्य त्रैमासिक'वरून पुनर्मुद्रित)**





**सोन्याच्या धुराचे ठसके**

पावशतकी सौदी अनुभव

**डॉ. उज्ज्वला दळवी**

सौदी अरेबियासारख्या अत्यंत प्रतिकूल हवामानाच्या, कट्टर इस्लामी राज्यात उपेक्षा, अन्याय नि हालअपेष्टा सहन करत, आयुष्यातील उमेदीची पंचवीस वर्षे वास्तव्य करणाऱ्या डॉ. उज्ज्वला दळवी यांनी त्या देशाच्या अंतरंगात शिरून, ते उकलून आपल्यापुढे ठेवले आहे. आपण वाचकांनी त्याबद्दल त्यांचं कृतज्ञ असायला हवं.

**मीना प्रभू**

**मूल्य २७५ रुपये, सवलतीत १६० रुपये**

# दलितांचा पंचायत राज संस्थांमधील सहभाग : मराठवाड्यातील वस्तुस्थिती

**रमेश जारे**

संविधानातील ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार महाराष्ट्रातील सर्व पंचायतराज संस्थांमध्ये अनुसूचित जाती, जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी ३३ टक्के राखीव जागांची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुसूचित जातींच्या राखीव जागांपैकी ३३ टक्के जागा दलित महिलांसाठी राखीव असतात. याप्रमाणे इतरही सामाजिक गटांतील स्त्रियांना राखीव जागांचा लाभ मिळतो. अन्य मागासवर्गांसाठी २७ टक्के जागा आरक्षित आहेत. सरपंच, उपसरपंच, पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद अध्यक्ष या पदांना ही सर्व आरक्षणे लागू होतात (पळशीकर, २००४). ७३ व्या घटना दुरुस्तीची अंमलबजावणी महाराष्ट्रात २४ एप्रिल १९९४ पासून, मुंबई ग्रामपंचायत व महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती दुरुस्ती कायदा, १९९४ या नावाने करण्यात आली आहे (दाते, २००२). या दुरुस्तीनंतर दोन निवडणुका तरी प्रत्येक पंचायत संस्थेच्या पार पडलेल्या आहेत.

७३ व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज संस्थामधील कारभारांमध्ये मोठे सकारात्मक बदल होतील आणि ग्रामीण भागातील राजकीय समीकरणे बदलून विकासाला चालना मिळेल या अपेक्षेने सर्वसामान्य जनता आणि या क्षेत्रातील अभ्यासक या प्रक्रियेकडे पाहताना दिसतात. गेल्या चौदा वर्षात ७३ व्या घटना दुरुस्तीच्या या बदलाचे परिणाम किती प्रमाणात झाले याबाबतचे मूल्यमापन करण्यापेक्षा या प्रक्रियेचे विश्लेषण करणे अधिक महत्त्वाचे आहे. विशेषतः आरक्षणामुळे दलित आणि महिलांना या घटनादुरुस्तीचा कशाप्रकारे फायदा झाला हे पाहणे उदबोधक ठरणार आहे. या शोधनिबंधात दलित आणि महिलांचा (दलित) मुख्यत्वे विचार केला आहे. सर्वसामान्य गटांतील महिलांचा या अभ्यासात समावेश केलेला नाही.

हा शोधनिबंध आचार्य पदवीकरता (पीएच्. डी. प्रबंधासाठी) सादर केलेल्या आकडेवारीवर आणि माहितीवर आधारित आहे. या प्रबंधासाठी मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि हिंगोली जिल्ह्यातील दलित सरपंच आणि ग्रामसभा सदस्यांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती जमा करण्यात आली आहे. या अभ्यासादरम्यान एकूण ३५ सरपंच व ५ उपसरपंचांच्या व ४०० सर्वसामान्य स्त्री-पुरुषांच्या म्हणजेच या अभ्यासातील संज्ञेप्रमाणे दलित नेते आणि ग्रामसथा सदस्यांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. 'दलितांचा राजकारणातील सहभाग' या संकल्पनेचा विचार केला तर मतदानात सहभागी होणे, निवडणुकांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होणे, प्रचारसभांना हजर राहणे, प्रचारयंत्रणा सांभाळणे, पक्षकार्यात सहभागी होणे, राजकीय पक्ष सांगेल ते काम करणे इत्यादी बाबींचा समावेश करता येईल. (कुमार, २००६).

या विषयाचे अनेक अभ्यास करण्यात आलेले आहेत. अगदी मराठवाड्याचा विचार करायचा झाल्यास ॲक्शन एड. इंडिया संस्थेने १९९१ व २००० साली असे दोन वेगवेगळे अभ्यास केलेले आहेत. या अभ्यासाचे संदर्भ डॉ. सुखदेव थोरात व प्रशांत नेगी यांनी 'महाराष्ट्रातील सामाजिक भेदभाव, नागरी हक्कभंग आणि अत्याचार, २००७' या पुस्तिकेत दिलेले आहेत. या सर्वेक्षणात पंचायत कार्यालयात जाण्यासाठी अस्पृश्यतेवर आधारलेला भेदभाव केला जात असल्याचे दिसून आले. दलितांना पंचायतराज संस्थांमध्ये सरपंच आणि उपसरपंच यांसारखी प्रतिष्ठेची पदे मिळाली आहेत, परंतु ती पदे त्यांना केवळ आरक्षणामुळे मिळाली आहेत. उच्च जातीतील ग्रामपंचायत सभासद निर्णय घेताना दलितांबरोबर चर्चादेखील करत नाहीत. याशिवाय, ज्या ठिकाणी दलित स्त्रिया सभासद किंवा पंचायतीत मुख्य म्हणून निवडून आलेल्या होत्या त्यांना त्यांच्याशी चर्चा केल्याशिवाय घेतलेले प्रमुख निर्णय कळवले जात होते किंवा त्यांना अशा बैठकीला गैरहजर न राहण्याचा सल्ला दिला जात असे. काही पंचायत समित्यांमध्ये दलितांसाठी बसण्याची वेगळी व्यवस्था केली होती. प्रा. येळणे (२००२) यांनी पार्टिसिपेटरी रिसर्च इन आशिया, नवी दिल्ली आणि निर्मला निकेतन, मुंबई यांच्याबरोबर केलेल्या अभ्यासामध्ये दलित आणि बिगरदलित यांचे संबंध चांगले नव्हते असे दिसून आलेले आहे. जारे व कुमार (२००२) यांनी उस्मानाबाद जिल्ह्याच्या केलेल्या अभ्यासानुसार दलित आणि महिला सरपंचांना उच्च जातीचे ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंच यांचेकडून ग्रामपंचायतीमध्ये काम करून दिले जात नाही असे दिसून आले. अनेक ठिकाणी केवळ ते दलित आणि महिला आहेत म्हणून त्यांच्यावर अविश्वासाचे ठराव

दाखल करण्यात आले आहेत.

प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश :

१) ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे दलितांच्या राजकीय सहभागामध्ये काय बदल झाले याचा शोध घेणे.

२) जे दलित प्रतिनिधी सहभागी होतात त्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय दर्जा काय आहे हे अभ्यासणे.

३) दलितांच्या सहभागास कोणते सकारात्मक आणि नकारात्मक घटक कारणीभूत होतात याचा शोध घेणे.

या अभ्यासात आधी उल्लेख केल्याप्रमाणे ३५ सरपंच व ५ उपसरपंच यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या ४० नेत्यांमध्ये २१ पुरुष आणि १९ स्त्रिया आहेत. त्यांपैकी जास्तीत जास्त म्हणजे ६५ टक्के दलित नेते ३१ ते ४५ या वयोगटातील असून २० टक्के नेते ४६ ते ६० या वयोगटातील आहेत. त्याचप्रमाणे १५ टक्के दलित नेते हे १८ ते ३० वयोगटातील आहेत. याचाच अर्थ तरुण वयोगटातील दलित जास्त प्रमाणात पंचायतराज संस्थामध्ये सहभागी होत आहेत. घटनादुरुस्तीपूर्वी गावातील वयस्क जमीनदार सरपंचपदावर हक्कदार असायचे. यामध्ये बदल होऊन तरुण पिढी गावातील राजकारणात सक्रिय होताना दिसत आहे. शिक्षणाचा विचार करता ४० टक्के दलित नेते म्हणजेच सरपंच, हे अशिक्षित आहेत. यामध्ये स्त्रियांचे ३२ टक्के प्रमाण आहे. आणखी ४० टक्के हे प्राथमिक ते उच्च प्राथमिक वर्गापर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. २० टक्के दलित नेते एस.एस.सी. ते पदवीपर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. शिक्षणाबाबतची नेत्यांची परिस्थिती चिंताजनक आहे, असे दिसून येते. सरपंच किंवा उपसरपंच यांना गावातील प्रमुख या नात्याने गावचा कारभार करावा लागतो. ग्रामपंचायतीचे बदलते स्वरूप लक्षात घेता सरपंचाला अनेक शासकीय कार्यालयांबरोबर संपर्क ठेवावे लागतात. गावात विकासयोजना राबवाव्या लागतात. त्याचप्रमाणे अनेक बैठकांना हजर राहून आपल्या गावाचे प्रतिनिधित्व करावे लागते. अशिक्षित दलित नेते हे करू शकत नाहीत. स्वतः अनेक बाबींची माहिती घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्याची जबाबदारी सरपंचावर आहे. यासाठी शिक्षणाची मोठी भूमिका आहे.

दलितांमध्येही अनेक स्त्री-पुरुष शिक्षित असताना ते राजकारणात का उतरत नाहीत किंवा सरपंचपदासाठी निवडणूक लढवत का नाहीत? या प्रश्नाचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. याबाबत गावातील लोकांबरोबर चर्चा केली असता असे दिसून आले की, ज्या गावांमध्ये दलित महिला व पुरुष सरपंचपदासाठी राखीव पद आहे, अशा गावांत सरपंचपदाचे उमेदवार निवडीची प्रक्रिया पूर्णपणे गावातील उच्च जातीतील पारंपरिक नेते मंडळी हातात घेतात, ते नेमके अतिशय गरीब, अशिक्षित, अज्ञानी आणि आपले आज्ञापालन करणाऱ्या उमेदवाराचे या पदासाठी नाव सुचवतात, आपल्याकडे उपसरपंच पद घेऊन गावाचा कारभार करतात आणि सत्ता आपल्या हातात ठेवतात (जारे व कुमार, २००२).

दलित नेत्यांपैकी ५० टक्के नेते हे दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. प्रत्यक्षात ५० टक्क्यांपेक्षा जास्त दलित नेते दारिद्र्यरेषेखाली आहेत. परंतु गावातील श्रीमंत लोकांची नावे दारिद्र्यरेषेत आल्यामुळे गरिबांना वगळण्यात आले अशी तक्रार अनेक दलित नेत्यांची ऐकू आली. दलित नेत्यांपैकी ५० टक्के नेते हे भूमिहीन आहेत. ५० टक्के दलित नेते मजुरी करून पोट भरतात. हे दलित नेते गावातील शेतकऱ्यावर अवलंबून असल्यामुळे गावातील नेते म्हणून त्यांना सन्मान दिला जात नाही. गरिबीच्या आर्थिक परिस्थितीमुळे दलित नेते सरपंच पदासाठी वेळ देऊ शकत नाही. ग्रामपंचायतीमध्ये काय कार्य करायला पाहिजे याबाबत ते विचार करू शकत नाहीत.

दलित नेत्यांची परिस्थिती सरपंचपद मिळण्याअगोदरपासूनच गरिबीची होती. ६२.५ टक्के दलित नेते हे गरीब परस्थितीची झळ अगोदरपासूनच सोसत असून सरपंच झाल्यानंतर त्यांच्या संख्येत वाढ होऊन ७५ टक्के नेते (सरपंच) हलाखीचे जीवन सोसत आहेत, असे दिसून आले. सरपंचपदामुळे मजुरीही बुडते आणि कुटुंबाच्या गरजा भागवण्यासाठी कर्ज काढावे लागते म्हणून त्यांची आर्थिक परिस्थिती आणखी हलाखीची झाली असे सांगण्यात आले. म्हणूनच ५० टक्के नेते सरपंचपदासाठी पुढच्या निवडणुकीत उभे राहण्यास इच्छुक नाहीत. परंतु ५० टक्के नेते अजूनही या पदापासून आपल्याला मानसन्मान मिळतो आणि लोकांचे काम करता येतात म्हणून पुढील निवडणूक जिंकण्यास उत्सुक आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळेच आपल्याला सरपंच पद मिळाले असे ८५ टक्के नेत्यांना (सरपंचांना) वाटते. घटना दुरूस्तीचा आणखी सकारात्मक परिणाम म्हणजे दलितांची मतदानातील टक्केवारीत वाढ झालेली दिसून येते. मागील वर्षी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत १०० टक्के नेत्यांनी मतदान केले आहे, असे नमूद केले असे असले तरी अजूनही ३२.५ टक्के दलित नेत्यांना पंचायतराज कायद्याअंतर्गत असणाऱ्या आरक्षणाबाबत माहिती नाही.

**दलितांचा ग्रामसभेतील सहभाग :**

७३ व्या घटना दुरुस्तीची एक अतिशय महत्त्वाची तरतूद म्हणून ग्रामसभेकडे पाहिले जाते. गावातील ज्या लोकांची नावे मतदार यादीत आहेत, त्यांना ग्रामसभेचे सदस्य समजण्यात येते. लोकशाही प्रक्रियेची प्रत्यक्ष अंमलबजावणी म्हणून ग्रामसभेकडे पाहिले जाते. इतर सर्व ठिकाणी उदा.- ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद आणि इतर ठिकाणी लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी काम पाहतात, ग्रामसभेत मात्र प्रत्यक्ष लोकच निर्णयप्रक्रियेमध्ये सहभागी होत असतात.

ग्रामसभेबाबत फार मोठ्या अपेक्षा

निर्माण झाल्या असल्या तरी संपूर्ण देशभरातच ग्रामसभेच्या बैठकांबाबत समाधानकारक परिस्थिती नाही. (मॅथ्यु, २०००, मंदार २००४) महाराष्ट्रात देखील ग्रामसभेची परिस्थिती चांगली नाही असे (दाते, २००२) नमूद करण्यात आले आहे. ग्रामसभेच्या साधारणतः सहा सभा महाराष्ट्रात अनिवार्य आहेत. (वेगवेगळया राज्यांत वेगवेगळे नियम आहेत). ग्रामसभा बैठका नियमित न होण्याचे प्रमाण मोठे असल्याचे २५ टक्के नेत्यांनी नमूद केले आहे. इतर ७५ टक्के नेत्यांनी ग्रामसभा होतात असे नमूद केले असले, तरी त्यापैकी ५० टक्के नेत्यांनी ग्रामसभेच्या बैठका कायद्याने ठरवून दिल्याप्रमाणे होत नाहीत, असे नमूद केले आहे.

या अभ्यासात असे दिसून आले की, फक्त २६ टक्के महिला ग्रामसभेत हजर असतात. गावात महिला ग्रामसभा होते असे केवळ १३.५ टक्के ग्रामसभा सदस्यांनी नमूद केले आहे. ग्रामसभा न होण्याची अनेक कारणे नमूद करण्यात आली आहेत. महत्त्वाच्या कारणांपैकी लोक ग्रामसभेला न येणे हे कारण ३५ टक्के दलित नेत्यांनी नमूद केले आहे. दुसरे महत्त्वाचे कारण, ग्रामसेवकांची ग्रामसभेबाबत उदासीनता हे २२.५ टक्के दलितांनी नमूद केले. तर, ग्रामसभेमध्ये जे निर्णय होतात त्यांची अंमलबजावणी न होणे हे कारण १७.५ टक्के दलित नेत्यांनी नमूद केले. उपसरपंच आणि सरपंच ग्रामसभेच्या बाबतीत उदासीन आहे हे देखील एक महत्त्वाचे कारण आहे. वरीलपैकी लोक ग्रामसभेला न येणे आणि ग्रामसभेच्या निर्णयांची अंमलबजावणी न होणे ही दोन कारणे एकमेकांशी संबंधित आहेत. याबाबत सविस्तर चर्चा केली असता असे समजले, की सुरुवातीच्या काही ग्रामसभांना लोकांची संख्या बऱ्यापैकी आढळून येत होती. ग्रामसभेबाबत मोठया प्रमाणात प्रचार केल्यामुळे लोक ग्रामसभेला येऊ लागले. ग्रामसभेमध्ये आपले प्रश्न मांडू लागले. परंतु या प्रश्नांची/समस्यांची यादी तयार झाल्यानंतर त्याचे पुढे काय करायचे, याबाबत ना सरपंचाला माहिती होती ना ग्रामसेवकाला! ग्रामसभेचे इतिवृत्त फक्त पंचायत समितीला पाठवले जाते. पंचायत समिती त्या समस्यांचे पुढे काय करते याबाबत लोकांना कधीच उत्तर मिळत नाही. शासनाकडून ज्या योजना येतात त्याचीच माहिती आणि अंमलबजावणी ग्रामसभेत होते, असे दिसून आले.

गावातील दलित ग्रामसभा सदस्यांनी असेही सांगितले की, ग्रामसभेवर कब्जा करतात. दलितांना ग्रामसभेत बोलू दिले जात नाही. दलितांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे वेळ देता येत नाही इत्यादी कारणे मुख्यतः दिसून आली. देशातील वेगवेगळ्या भागांतील ग्रामसभा यशस्वी होण्यासाठी जमिनीच्या पुनर्वाटपासारखे कायमस्वरूपी आणि 'स्ट्रक्चरल'बदल करणेच आवश्यक आहेत (मॅथ्यु, २०००).

निर्णयप्रक्रियेत केवळ ५० टक्के दलित नेत्यांचा ग्रामपंचायतींमध्ये सहभाग घेतला जातो. इतर ५० टक्के ग्रामपंचायतींमध्ये अजूनही उच्च जातीचे इतर सदस्य ग्रामसेवकाच्या मदतीने ग्रामपंचायतीमध्ये निर्णय पार पाडतात. ग्रामपंचायतीच्या आणि ग्रामसभेच्या निर्णयप्रक्रियेत ग्रामसेवकांचा हस्तक्षेप ५० टक्के दलित नेत्यांनी नमूद केला आहे. गावातील पंचायतराज संस्थामधील दलितांचे कमी सहभागाचे महत्त्वाचे कारण म्हणजे मराठवाड्यातील दलित नेत्यांबरोबर आणि सर्वसामान्य जनतेबरोबर जातीयतेवरून केलेला भेदभाव हे आहे. ४० टक्के दलित नेत्यांनी आणि ६० टक्के ग्रामसभा सदस्यांनी राजकीय सहभागातील जातीवरून केलेला भेदभाव हे सर्वात मोठे कारण आहे असे नमूद केले. गावातील सामाजिक भेदभावाच्या बाबतीत अजूनही ५२.५ टक्के दलित नेत्यांना गावातील मंदिरात प्रवेश नाही. २२.५ टक्के गावांमध्ये गावातील दलितांना सार्वजनिक कार्यक्रमात अजूनही एकत्र जेवण देत नाहीत. अनेक गावांमध्ये दलितांसाठी वेगळी पाणीपुरवठ्याची साधने करावी लागली आहेत. दलित सरपंचांवर अविश्वासाचे ठराव केवळ जातीच्या कारणावरून आणले जातात, असे १० टक्के दलित सरपंचांनी नमूद केले आहे. गेल्या पाच वर्षांत दलित सरपंचांवरील अविश्वासाचे ठराव कमी झालेले आहेत, असे दिसून आले. कारण त्यापूर्वी हे प्रमाण ३० ते ४० टक्क्यांपर्यंत होते (जारे व कुमार, २००२). परंतु त्याचबरोबर दलित जातीमध्ये अंतर्गत उदा.- महार विरुध्द मातंग व मातंग विरुध्द महार इत्यादी स्वरूपाच्या अविश्वासाच्या ठरावाचे प्रमाण वाढत आहे. या अभ्यासा दरम्यान सेनगाव तालुक्यात अशा प्रकारचे १० पैकी २ गावांमध्ये अविश्वासाचे ठराव आणण्यात आले होते.

दलितांना दारिद्र्यामुळे उपजीविकेसाठी उच्च जातीच्या शेतजमीन मालकांवर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे या जमीनमालकांचा दलितांच्या राजकीय सहभागाबाबत हस्तक्षेप निर्माण होतो. जमीन मालकांचा दलितांच्या राजकीय सहभागाबाबत कामात हस्तक्षेप, सरपंच होण्यासाठी दलित सदस्यांना त्यांनी सांगितलेल्या त्या व्यक्तीला पाठिंबा देणे आणि अविश्वासाच्या ठरावाच्या वेळी पाठिंबा देणे/काढून घेणे इ. पध्दतीचे दबाव आणणे अशा बाबींचा समावेश होतो.

दलित सरपंचाच्या कामात उच्च जातीचे ग्रामसभा सदस्य आणि ग्रामपंचायतीचे सदस्य सहकार्य करत नाहीत. दलित सरपंचांनी काही कार्यक्रम सुरू केल्यास त्या कार्यक्रमामध्ये सहभागी न होणे आणि ते कार्यक्रम अयशस्वी करण्यासाठी मुद्दाम प्रयत्न करणे असे ५० टक्के नेत्यांनी आणि ५० टक्के ग्रामसभा सदस्यांनी नमूद केले आहे. मराठवाडयातील ५० टक्के दलित सरपंचांनी असे नमूद केले की, त्यांना अजूनही सरपंच म्हणून गावात मान सन्मान दिला जात

नाही. यामध्ये मुख्यतः गावातील सार्वजनिक कार्यक्रमांना न बोलावणे, शासकीय अधिकाऱ्यांनी गावात कोणतेही नवीन कार्यक्रम करताना सरपंचांना मान-सन्मान न देणे, वेगवेगळ्या बैठकांचे अध्यक्षपद न देणे आदी बाबींमध्ये सरपंचांना डावलले जाते. ते गावाच्या ग्रामपंचायतीचे प्रमुख असूनसुध्दा गावातील उच्च जातीचे पारंपरिक पुढारी, जामीनदार, पाटील यांनाच सरपंचापेक्षा जास्त मानपान दिला जातो. दलित सरपंचांच्या राजकीय सहभागात वाढ होण्यासाठी गावातील अंतर्गत जातिभेदाव्यतिरिक्त इतरही बाह्य घटकांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. यामध्ये मुख्यतः

१) दलित सरपंचांसाठी विशेष प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

२) गावातील इतर सदस्यांसाठी दलित आणि महिला प्रश्नांबाबत सचेतन/जागृतीचे कार्यक्रम राबविणे.

३) दलित सरपंचांसाठी विशेष मानधनाची तरतूद करणे.

४) जे शासकीय अधिकारी, कर्मचारी दलित सरपंचांना सहकार्य करत नाहीत त्यांच्यावर कारवाई करणे.

आरक्षणामुळेच आपण सरपंच झालो, असे ७० टक्के नेत्यांना वाटते. परंतु आरक्षणाची तरतूद दलितांचा राजकीय सहभाग वाढण्याला पुरेशी नाही. कारण खऱ्या अर्थाने अजूनही गावातील सत्ता गावातील उच्च जातीच्या पुढाऱ्यांच्या हाती आहे. त्यामुळे गावातील विकास योजनादेखील दलित सरपंच दलित जनतेला देऊ शकत नाहीत, असे ४० टक्के नेत्यांनी नमूद केले आहे.

**निष्कर्ष :**

७३ व्या घटना दुरूस्तीमुळे देशात आणि महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेमध्ये मूलगामी बदल होणे अपेक्षित आहे. ग्रामसभेला विशेष महत्त्व आणि अधिकार दिल्यामुळे गावातील सर्वसामान्य माणूस प्रत्यक्ष प्रक्रियेत सहभागी होईल असे अपेक्षित आहे. परंतु गेल्या १४ वर्षांची वाटचाल पाहाता, या क्षेत्रात केवळ कायदे करून भागणार नाही. कारण ७३ व्या घटना दुरुस्तीद्वारे जरी शासनाकडून पंचायतराज संस्थांना अधिकार विकेंद्रीत झाले असले आणि ग्रामपंचायतीपर्यंत आले असले, तरी दलितांसाठी मात्र गावातील त्यांच्याबरोबर पिढयान्‌पिढया जातीभेद करणाऱ्या पुढाऱ्यांकडून अधिकारांचे विकेंद्रीकरण आणि दलित समावेशाचे धोरण अपेक्षित आहे.

**संदर्भ :**


१) पळशीकर, सुहास, नितीन, बिरबल २००४, महाराष्ट्राचे राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२) कुमार, गिरीश २००६ लोकल डेमॉक्रसी इन इंडिया, सेज पब्लिकेशन, नवी दिल्ली.

३) थोरात, सुकदेव व नेगी, प्रशांत २००७, महाराष्ट्रातील सामाजिक भेदभाव, नागरी हक्कभंग आणि अत्याचार. सुगावा प्रकाशन, पुणे.

४) येळणे, घनश्याम २००२, दलित लीडरशिप अॅण्ड गव्हर्नन्स इन ग्रामपंचायतस् इन महाराष्ट्र, न्यू दिल्ली.

५) जारे, रमेश व कुमार संतोष २००२, मोशन ऑफ नो कॉनफिडन्स अगेन्स्ट दलित अॅण्ड वूमेन सरपंचेस, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर.

६) मॅथ्यु जॉर्ज २००२ पंचायती राज इन इंडिया-अॅन ओव्हरव्ह्यू, स्टेटस ऑफ पंचायती राज इन इंडिया, न्यू दिल्ली.

७) मंदार, हर्ष, २००४ व रिप्पड चेस्ट, बुक फॉर चेन्ज, बेंगलोर.

८) दाते, एस.एन. २००२ डायनॅमिक्स ऑफ न्यू पंचायती राज इन इंडिया, नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ रुरल डेव्हलपमेंट, हैदराबाद.



**- रमेश जारे**

टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर.

ramesh_jare@yahoo.co.in





'निष्कलंक' पितापुत्र दादोबा ठाकूर आणि गोविंद ठाकूर

**भारतातील स्टेनलेस संस्कृतीचे जनक**

संपादन **शरयू ठाकूर/ दिनकर गांगल**

कै. दादोबा ठाकूर ह्यांनी गेल्या शतकाच्या पूर्वार्धात धातुशास्त्रात उत्तम कसब दाखवले, स्वत:ची यंत्रशाळा उभी केली आणि स्टेनलेस स्टील या धातूची भारतास; विशेषत: महाराष्ट्रास ओळख करून दिली. त्यांचे चिरंजीव गोविंद ठाकूर ह्यांनी त्यांचा वारसा समर्थपणे चालवला आणि मतपेटच्या, गॅसच्या शेगडच्या, संरक्षणसामुग्री अशा, बदलत्या काळानुरूप वस्तूंची निर्मिती केली. ह्या पितापुत्रांचे कर्तृत्व संकलित केलेला हा एक महत्त्वपूर्ण दस्तावेज ठरणार आहे.

**मूल्य २५० रुपये, सवलतीत २०० रुपये**

# पाकिस्तान निर्मितीपूर्व दिसलेले संकट

## अरविंद व्यं. गोखले

लोकमान्यांच्या निधनानंतर बॅ. महमद अली जीना एकदम बदलले असा जो आरोप करण्यात येतो, तो तितकासा खरा नाही. मुस्लिम लीगच्या अलाहाबाद अधिवेशनात महमद इक्बाल यांनी मुसलमानांना वायव्य भागात स्वत:ची भूमी हवी, अशी मागणी केली होती. हे महत्त्वाचे, की ती त्यावेळी वायव्य भागापुरतीच मर्यादित होती. काश्मीरच्या प्रशासनात मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधीत्व दिले जात नाही, अशा अर्थाचे निवेदन त्याच सुमारास काश्मीरच्या महाराजांना देण्यात आले. यावेळी महाराजांनी त्यांना काय उत्तर दिले ते माहीत नाही, पण महाराजांनी एका संस्थानाच्या दिवाणपदी असणाऱ्या इंग्रजाला बदलून एका पंडिताला नेमले. शेख अब्दुल्ला यांनी याचवेळी मुस्लिमांना नोकऱ्यांमध्ये राखीव जागा द्या, अशी मागणी महाराजांकडे केली. शेख अब्दुल्ला त्याचवेळी राजकारणात आले. याच शेख अब्दुल्लांनी १९३८ च्या मुस्लिम कॉन्फरन्सच्या अधिवेशनात जातीयवादी शक्तींवर कडाडून हल्ला चढवला आणि राजकीय प्रश्नांमध्ये मुसलमान, बिगर मुसलमान असे तंटे विनाकारण उभे करू नका, असे बजावले. सर्वसाधारणपणे हाच तो काळ होता, जेव्हा जीनांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र राष्ट्रच आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. इक्बाल यांच्यावर मात करायची ही एक नवी चाल होती. तिला पुढे यश येत गेले. या सर्व पार्श्वभूमीवर आपण एका जुन्या पुस्तकाकडे पाहणार आहोत.

'पाकिस्तानचे संकट' हे १९४१ मध्ये लिहिलेले पुस्तक आहे. शि.ल. करंदीकरांनी ते लिहिले असून पाकिस्तानविषयी होणाऱ्या चर्चेतून त्यांनी बरेच खाद्य मिळवून दिले आहे. या पुस्तकात एकूण १३ प्रकरणे असून हे पुस्तक २४० पानांचे आहे. पहिले प्रकरण 'पाकिस्तान शब्द व कल्पना' हे आहे. पहिल्या प्रकरणात सुरुवातीलाच पाकिस्तान या शब्दाची निर्मिती 'पाक अधिक इ अधिक स्तान' अशी स्पष्ट करून सांगितली आहे. या शब्दाला भरपूर प्रसिद्धी कशी मिळते आहे, हे सांगताना करंदीकर म्हणतात, की ''हा शब्द गेल्या दोन-तीन वर्षांत सर्वांच्या जास्त परिचयाचा झाला आहे. पाकिस्तानची मागणी पूर्ण झाल्याशिवाय मुस्लिम स्वस्थ बसणार नाहीत, असे बजावून सांगायला त्यांनी प्रारंभ केल्यामुळे या शब्दाला प्रसिद्धीही मिळते आहे. पाकिस्तान हा एक भला मोठा बागूलबोवा आहे. त्यामुळे भारतीय राष्ट्राला आणि राष्ट्रीयत्वाला मोठा धोका उत्पन्न होणार आहे इत्यादी कल्पना मोघमपणाने पुष्कळांच्या मनात उद्भवू लागल्या आहेत. या कल्पना स्पष्ट स्वरुपात सर्वांच्या मनात बिंबणे व या घातकी कल्पनांच्या प्रतिकारासाठी सर्वांनी सिद्ध होणे हे प्रस्तुतच्या परिस्थितीत भारतातील सर्वांचे; निदान भारतातील कोट्यावधी हिंदूंचे पहिले पवित्र कर्तव्य होय.'' १९४० च्या मार्च महिन्यात बॅ. जीना यांनी लाहोरमध्ये पाकिस्तानची मागणी करणारा ठराव केला आणि हे पुस्तक १९४१ मध्ये पूर्ण झाले. थोडक्यात, जीनांच्या मागणीनंतरच्या वर्षभरात हे पुस्तक लिहून पूर्ण झाले.

करंदीकरांच्या या पुस्तकाला ल.ब. भोपटकरांची प्रस्तावना आहे. भोपटकरांनी काँग्रेसला पाकिस्तानविषयी तेव्हा सुरू झालेल्या चर्चेबद्दल दोषी धरले आहे. ल.ब. भोपटकरांच्या नावामागे त्या काळात 'दे.भ.




धर्मवीर' हा किताब हिंदूमहासभावाल्यांकडून लावला जात असे. ते म्हणतात, ''हिंदू संघटनेचा महामंत्र' हे शेवटले तेरावे प्रकरण तर फारच सरस उतरले आहे, असे म्हटल्यावाचून राहवत नाही. त्यात हिंदूसभेचा म्हणून जो महामंत्र दिला आहे, तो प्रत्येक हिंदूमहासभावाल्यानेच नव्हे तर प्रत्येक हिंदूनेही स्वत:च्या ठायी बाणून घेऊन तो अंमलात आणण्याचे प्रयत्न केल्यास पाकिस्तानच्या संकटास यशस्वीपणाने तोंड देण्याइतका हिंदू समाज समर्थ व प्रभावी नि:संशय बनेल.'' स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचारच या प्रकरणात अधिक खुलासेवार मांडण्यात आले आहेत. करंदीकर म्हणतात, ''हिंदू बाटत नाही, कोणताही हिंदू जन्माने इतर हिंदूहून श्रेष्ठ असू शकत नाही, वगैरे

कल्पना नुसत्या बोलत राहून भागणार नाही, कृतिरुपाने त्या प्रत्यक्ष व्यवहारात उतरवून दाखवल्या पाहिजेत. त्या तशा उतरवून कशा दाखवाव्या या प्रश्नाचे चिंतन करणे म्हणजेच सामान्यातल्या सामान्य हिंदूला दैनंदिन व्यवहारात हिंदूसंघटनावादी बनविणे होय.''

हिंदू समाजातल्या विषमतेवर यात कठोर टीका करण्यात आली आहे. दिसते ते असे की या मंडळींना फार उशिरा शहाणपण सुचले असावे अशी शक्यता आहे. तीस कोटी समाजातल्या दलितांबद्दल व दु:खितांबद्दल ममत्व उत्पन्न होणे ही गोष्ट मन मोठे झाल्याशिवाय साधण्यासारखी नाही. आपल्या भोवताली घडणाऱ्या अनेक घटनांकडे पाहिले तर दुर्दैवाने हे मान्य करावे लागते की, मोठ्या मनाची माणसे समाजात फार थोडी आहेत.

'प्रांतांची अडाणी मांडणी' या प्रकरणात लाहोरच्या अधिवेशनात मुस्लिम लीगने प्रांतांची केलेली मागणी आणि त्यासंबंधीचा वाद याबाबत ऊहापोह करण्यात आला आहे. १९१९ च्या घटना कायद्यात नसलेली प्रांतरचना १९३५ च्या कायद्यात उमटली ती हेतुपरस्पर आहे, असे या प्रकरणात नमूद करण्यात आले आहे. नवी प्रांतरचना कायदेशीर होताच त्या रचनेमागे दडून बसलेला हेतू सहजच सफल व्हावा, असा हा डाव टाकण्यात आला असल्याचे या पुस्तकात नमूद करण्यात आले आहे. मुस्लिम लीगने भौगोलिक सलगतेचा आग्रह धरला होता, पण मग पश्चिम विभागापासून काही हजार किलोमीटर दूर असणाऱ्या प्रदेशाची म्हणजेच पूर्व बंगालची मागणी कशी मान्य केली गेली, हे यातून स्पष्ट होत नाही. लॉर्ड कर्झन याने बंगालच्या केलेल्या फाळणीत बंगालला पाकिस्तानशी जोडायचा कट आहे, हे तेव्हाच स्पष्ट झाले होते. पण काँग्रेसने त्यावेळी या प्रांतरचनेला जसा आणि जेवढा विरोध केला तसा आणि तेवढा विरोध हिंदूमहासभेनेही केला नव्हता ही वस्तुस्थिती आहे.

ओरिसा प्रांत बंगालपासून वेगळा काढण्याची आवश्यकता माहितगार सरकारी अधिकाऱ्यांना १८६८ सालापासून भासत होती. हिंदुस्थान सरकारचा सेक्रेटरी एच.एच. रिस्ले याने ३ डिसेंबर १९०३ रोजी बंगालच्या चीफ सेक्रेटरीला लिहिलेल्या पत्रातदेखील या मुद्यावर भर देण्यात आलेला आहे. ओरिसा प्रांत वेगळा करण्यास लॉर्ड कर्झन कबूल होता, पण काही प्रांतिक सरकारांच्या विरोधामुळे त्याने तो विषय तसाच सोडून दिला, अशीही माहिती पुस्तकात आढळते. ओरिसाची इतकी जुनी मागणी कित्येक वर्षांपर्यंत लोंबकाळत राहिली होती. काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेची पद्धत सुरू केल्यानंतर १२-१३ वर्षांनी ओरिसाचे स्वतंत्र स्थान सरकारकडून मान्य करण्यात आले. सिंधची मागणी मात्र लगोलग स्वीकारण्यात आली. या दोन घटनांमधील फरक काँग्रेसच्या भाषावार प्रांतरचनेमुळे झालेला नसून तो सरकारच्या नागमोडी धोरणांमुळे झालेला आहे, असेही या पुस्तकात नमूद करण्यात आले आहे. याच ठिकाणी त्यांना फाळणीचा दृष्टिकोन इंग्रज सरकारने कसा पक्का स्वीकारलेला आहे तेच स्पष्ट करायचे आहे.

डॉ. आंबेडकरांच्या फाळणीविषयक विचारांचा ऊहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे. करंदीकरांनी म्हटले आहे की, डॉ. आंबेडकर यांनी २९ जानेवारी १९३९ रोजी पुण्यास 'फेडरेशन विरूद्ध स्वातंत्र्य' या विषयावर विचारप्रवर्तक व्याख्यान दिले. त्या व्याख्यानाची भूमिका स्पष्ट करताना त्यांनी सध्याचे गांधीयुग हे हिंदुस्थानातले अंधारयुग असल्याचे म्हटले होते, त्याचा संदर्भ देऊन करंदीकरांनी डॉ. आंबेडकरांच्या 'थॉट्स ऑफ पाकिस्तान' या पुस्तकाचाही संदर्भ दिला आहे. डॉ. आंबेडकर हे रानडे, गोखले, टिळक यांच्या विचारनिष्ठा राजकारणाचे अभिमानी आहेत असे म्हटले आहे. विशेष म्हणजे करंदीकर म्हणतात, की गेल्या सात-आठ महिन्यांत मराठीत पाकिस्तान या विषयावर लिखाण प्रसिद्ध झाले आहे त्यात प्रामुख्याने आधारभूत असलेली माहिती प्राय: डॉ. आंबेडकरांच्या 'थॉट्स' मधूनच घेण्यात आली आहे. एका विषयाला पैलू पाडून त्याचा कसा अभ्यास करावा, हे डॉ. आंबेडकरांकडून शिकावे, असेही त्यांनी या प्रकरणात म्हटले आहे. सध्याच्या हिंदुस्थानात हिंदू राष्ट्र आणि मुसलमान राष्ट्र अशी दोन राष्ट्रे आहेत, असे स्वातंत्र्यवीर सावरकर यांना उद्धृत करून डॉ. आंबेडकरांनी हिंदूमहासभावाल्यांची तेव्हा खूपच पंचाईत करून टाकली, पण करंदीकरांनी तसे न म्हणता डॉ. आंबेडकरांच्या इतर मार्गदर्शनाविषयी अधिक माहिती दिली आहे.

माझ्या मते, मराठीमध्ये त्या काळात प्रकाशित करण्यात आलेले या विषयावरील हे एकमेव पुस्तक असावे. नंतरच्या काळातही निघालेल्या पुस्तकांत फाळणीनंतरचा संताप दिसतो, तसे या पुस्तकाचे नाही. यात अभिनिवेश जरूर आहे, कुठेही खोटारडेपणा दिसत नाही. तेव्हाच्या हिंदुस्थानात हिंदू आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे होत, असे आंबेडकरांनी म्हटले होते असे सांगणाऱ्यांनी सावरकरांचेही तेच मत होते, हे मात्र कधी कबूल केले नाही. अर्थात जे काही प्रांजळपणे सांगता येईल ते सांगायचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. त्या काळची परिस्थिती समजावून घ्यायला हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे.

पाकिस्तानची मागणी कशी चुकीची आहे, हे सांगायचा प्रयत्न या पुस्तकातून करण्यात आला आहे. अर्थात हे पुस्तक तेव्हा किती वाचले गेले, त्याला प्रतिसाद किती मिळाला हे कळायला मार्ग नाही. त्याचा शोध घ्यायची गरज मात्र आहे. हा प्रतिसाद पुणे शहरातच जास्त मिळाला असणार, हे उघड आहे.

**– अरविंद व्यं. गोखले**
एन ४, निरंत वसाहत,
बिबवेवाडी, पुणे ३७.
arvindgokhale@gmail.com

# पाणी आणि वापर

## अनंत देशपांडे

पाणी ही एक जीवनावश्यक गोष्ट आहे. माणूस अन्नाशिवाय काही दिवस काढू शकतो पण पाणी आणि हवेशिवाय मात्र जगता येत नाही. नेमक्या याच दोन गोष्टींवर आता संकट येऊ पाहत आहे. आपल्याला मिळणारे सगळे पाणी पावसामुळे मिळते. भारतात भरपूर पाऊस पडतो. इतका की जगातले इतर देश भारताचे वर्णन हा एक ओला देश आहे म्हणून करत असतात. एका बाजूला, चेरापुंजीला १५००० मिलिमीटर एवढा पाऊस पडतो तो भारतातच. हे एक टोक सोडले तरी सिंधुदुर्ग जिल्ह्यात आणि अंदमान निकोबारमध्ये तो ३००० मिलिमीटर पडतो आणि रत्नागिरी जिल्ह्यात २७००-२८०० मिलिमीटर पडतो. मुंबईत सरासरीने तो २००० ते २५०० मिलिमीटर पडतो. सगळ्यात कमी पाऊस महाराष्ट्रात लातूर जिल्ह्यात पडतो तो ६०० मिलिमीटर. पण राजस्थान राज्यात मात्र तो १५० मिलिमीटरच पडतो. महाराष्ट्रातील पावसाची दर राज्यागणिक सरासरी १००० मिलिमीटर एवढी आहे आणि महाराष्ट्राच्या ३५ जिल्ह्यांतील पाण्याच्या गरजेची सरासरी काढली तर ती पावसामुळे मिळणाऱ्या पाण्याच्या १० ते १५ टक्के एवढीच आहे. याचा अर्थ आपल्याकडे पडणाऱ्या पावसाचे ८५ टक्के पाणी उरले पाहिजे. पण तसे न होता उलट आपल्याला टंचाई जाणवते आणि जिल्ह्याजिल्ह्यात पाण्याच्या टँकरने पाणी पुरवावे लागते. मग हे पाणी जाते कोठे? तर हे पाणी गटारांमधून समुद्रात जाते. जेथे समुद्र नाही तेथे ते नदीत जाते. जेथे मातीची जमीन आहे तेथे ते जमिनीत मुरते आणि जमिनीखालच्या पाण्याची पातळी वाढते. त्यामुळे विहिरींना पाणी मिळते. पण आपल्याकडील नद्या सांडपाण्यामुळे आणि कारखान्यांतील नको असलेली रसायने त्यात टाकल्याने प्रदुषित झाल्या आहेत. तलावात, नदीत साठवलेले पाणीसुद्धा बाष्पीभवनाने हवेत उडून जाते आणि त्याचे प्रमाण साठवलेल्या पाण्याच्या ३३ टक्के म्हणजे एक तृतियांश एवढे प्रचंड असते. आपली भारतभरची पाणीटंचाई पडणाऱ्या पावसाच्या जेमतेम १-२ टक्के एवढीच आहे कारण आपली सगळी मिळून गरजच मुळी १० ते १५ टक्के आहे.

गोड पाणी हे दुर्मिळ आहे. पृथ्वीच्या ७० टक्के भागावर पाणी असून उरलेल्या ३० टक्के भागावर जमीन आहे. या ७० टक्के भागावरील जमिनीवर असणारे पाणी हे मुख्यत: समुद्राचे आहे. कारण पृथ्वीवरील एकूण पाण्यापैकी ९७.६ टक्के पाणी हे समुद्राचे असून ते खारे आहे. उरलेले २.४ टक्के पाणी खारे नाही म्हणून त्याला आपण गोड पाणी म्हणतो. परंतु या २.४ टक्के पाण्यापैकीही ७७ टक्के पाणी उत्तर आणि दक्षिण ध्रुवांवर बर्फाच्या स्वरूपात अडकून पडले आहे. उरलेल्यातील ११ टक्के पाणी जमिनीत इतके खोल आहे की ते वर काढणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे २.४ टक्क्यांच्या १२ टक्के भाग म्हणजे पृथ्वीवरील एकूण पाण्यापैकी पाव टक्का एवढाच भाग मानवजातीच्या एकूण व्यवहारासाठी उपलब्ध आहे. हा पाव टक्काही प्रचंड असल्याने आपले सर्व व्यवहार व्यवस्थित चालतात. पण वाढत्या लोकसंख्येमुळे आणि निर्सगाच्या लहरीपणामुळे पाऊसमान बदलत आहे. कधी ते कमी असते तर कधी ते जास्तही असते. आणि लहरीपणा म्हणाल तर आता हिवाळ्यातही जागोजागी पाऊस पडत असल्याचे आपण पाहत आहोतच.

मुंबई महानगरपालिका ही खूप मोठी महानगरपालिका आहे. तिचे अंदाजपत्रक गोवा आणि केरळ या राज्यांपेक्षाही जास्त आहे. आज मुंबई महानगरात दीड कोटी लोक राहतात. ही लोकसंख्या कॅनडा देशाच्या निम्मी आहे. मुंबईचा भूभाग खूप चिंचोळा आहे. मुंबई महानगरपालिकेचे पाणी खाते, त्यात काम करणारे इंजिनीअर आणि एकूणच महानगरपालिका दरवेळी वाढत्या लोकसंख्येला तोंड देऊनही पाणी, वीज, बस वाहतूक कशी करता येईल याचा विचार करत असते. पण शेवटी या सगळ्या गोष्टींना कोठेतरी आणि केव्हातरी एक मर्यादा पडतेच. यंदाच्या वर्षी मुंबईत म्हणावा तसा पाऊस न पडल्याने मुंबईच्या पवई, विहार, वैतरणा, भातसा या तलावांत आवश्यक तेवढे पाणी साठले नाही. मुंबई महानगरपालिकेचे पाणी खाते दरमहा तलावातील पाण्याची पातळी, मुंबईला रोजचा करावा लागणारा पुरवठा आणि शिल्लक राहिलेला साठा याचे हिशेब मांडत आहे. त्यावरून हे पाणी जूनमध्ये पडणाऱ्या पुढच्या पावसापर्यंत पुरे पडू शकेल की काही कपात करायला पाहिजे हे त्यांना समजते. आताच्या त्यांच्या हिशेबावरून तरी असे दिसते की दर आठवड्याला एक दिवसाची पाणीकपात केल्याशिवाय हे पाणी पुरे पडू शकणार नाही. दर आठवड्याला एक दिवस धरून पुढील सहा महिन्यांत जर २४ दिवसांची कपात केली ते हे पाणी पुरे पडू शकेल असे त्यांना वाटते. पण हे होणे अवघड आहे. कारण ज्या दिवशी पाणीकपात असेल त्याच्या आदल्या दिवशी आपण घरातील सगळी भांडीकुंडी पाण्याने

भरून ठेवणार, अगदी चहाच्या कपापासून सर्व भांड्यांत. म्हणजे कपातीच्या आदल्या दिवशी जास्त पाणी खपणार. मग खऱ्या अर्थाने कपात होणार नाही.

मला वाटते, ही चिंता फक्त महानगरपालिकेची न ठरता ती तुम्हा-आम्हा सगळ्यांची का ठरू नये? शेवटी हे सगळे तुमच्या-आमच्यासाठीच चालले आहे ना? मग आपण त्यांना मदतीचा हात का देऊ नये? आपल्यासारख्या सामान्यजनांच्या हातात पाणी काटकसरीने वापरणे तर नक्कीच आहे ना? मग आपण ते करुया का? महानगरपालिका रोज आपल्याला माणशी १०० लिटर पाणी देते. यातील फक्त ५ लिटर पाणी पिण्यासाठी आणि स्वयंपाकासाठी आपण वापरतो. बाकीचे पाणी आंघोळ, भांडी घासणे, कपडे धुणे, संडास-बाथरूम स्वच्छ ठेवण्यासाठी आपण वापरतो. आपण आंघोळीसाठी बादलीभर पाणी घेतो अथवा शॉवरने १० मिनिटे अंघोळ करतो. एका बादलीत २० लिटर पाणी मावते आणि आपण पूर्ण बादली आंघोळीसाठी वापरतो. त्याऐवजी आपण अर्ध्या बादलीतही आंघोळ करू शकतो. आपण तसे केले तर दररोज माणशी दहा लिटर पाण्याची कपात करू शकतो. आपल्या घरी पाहुणे आले की आपण त्यांना ग्लासभरून पाणी प्यायला देतो. पाहुणा अर्धा ग्लास पाणी पितो आणि उरलेले अर्धा ग्लास पाणी आपण बेसिनमध्ये फेकून देतो. त्या ऐवजी पाहुण्यांना अर्धा ग्लासच पाणी द्यावे आणि ज्यांना आणखी हवे असेल तेवढ्यांनाच आणखी अर्धा ग्लास पाणी द्यावे. आपण घरातले लोक पाणी प्यायल्यावर दरवेळी तो ग्लास अथवा भांडे विसळण्यासाठी दोन ग्लास पाणी वापरतो. पण जर घरातल्या प्रत्येकाने ग्लासला तोंड न लावता पाणी प्यायले तर ग्लास दर वेळी विसळण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. रोज सकाळी तोंड धुताना ब्रश ओला करण्यापासून तोंड धुणे पूर्ण होईपर्यंत आपल्यापैकी खूपजण बेसिनचा नळ चालू ठेवतात. त्याऐवजी एकदा ब्रश ओला करून झाल्यावर नळ बंद करावा आणि दात घासून झाल्यावर मग तोंड धुण्यापुरता नळ चालू करावा. यामुळे सहजी एक-दोन लिटर पाण्याची बचत होऊ शकेल. तीच गोष्ट पुरुषमंडळी दाढी करतानाची. ते संपूर्ण दाढी होईपर्यंत नळ चालूच ठेवतात. मित्रांनो, आपल्या रोजच्या व्यवहारातील अशा सर्व गोष्टींकडे पाणी वाचवण्याच्या नजरेने पाहिल्यास आपण रोजची वीस लिटर पाण्याची बचत सहजी करू शकू. असे झाले तर आठवड्याच्या सात दिवसांत रोजचे वीस लिटर या हिशेबाने १४० लिटरची बचत होईल. तर महानगरपालिका दर आठवड्याला एक दिवस नळ बंद ठेवणार नाही आणि त्यातच आपल्या सर्व नागरिकांचा फायदा आहे. आपल्यासमोर कोणी छडी घेऊन का बरे उभे राहवे? एकदा समस्या समजली की त्याचे उत्तर आपले आपण शोधून काढण्यातच शहाणपण नाही का? ज्यांच्याकडे मोटारसायकल, स्कूटर, मोटार आहे ते रोज सकाळी ही वाहने धुतात. पण आता पावसाळा नसल्याने त्यावर चिखल उडणार नाही. फक्त धूळच उडालेली असते. अशा वेळी ही वाहने धुण्याऐवजी नुसती कपड्याने पुसून चालणार नाहीत का?

ही सवय यंदा पाणीटंचाई आहे म्हणून यंदापुरती न ठेवता जर आपल्या अंगी कायमची बाणली तर काही पाणी उरेल आणि ते ज्या १००-२०० किलोमीटर अंतरावरून महानगरपालिका आणते तिथपासून वाटेतल्या लोकांना देता येईल. त्यांना पाणी मिळत नसल्याने नाइलाजाने ते नळ फोडतात. त्यांना पाहिजे तेवढे पाणी घेतात पण दुर्दैवाने हे नळ गळतच राहतात. असे गळून जाणारे पाणी कुणाच्याच उपयोगाशिवाय वाया जाते. तेव्हा अशा प्रकारच्या गळतीतून वाया जाणारे पाणीही आपल्या काटकसरीतून वाचवता येणार आहे. शिवाय वाचलेले पाणी शेतीसाठीही वापरता येईल. आज शेतीला पाणी कमी पडत आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिल्याने शेतीची उपासमार होत आहे.

महानगरपालिकेपुढची ही समस्या आपणा सर्वांची आहे असे समजून आपण सर्वजण पाणीबचत करुया आणि आपण सर्व नागरिक आणि प्रशासन एकच आहोत हे या निमित्ताने सिद्ध करुया !

**– अनंत देशपांडे**
apd1942@gmail.com




## गांगल७० ग्रंथाली३५

वाचकदिनी प्रसिद्ध झालेला महत्त्वपूर्ण दस्तावेज...

दिनकर गांगल यांच्या सत्तरीनिमित्त त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक कार्याविषयी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी केलेले लेखन आणि दिनकर गांगल यांची प्रदीर्घ मुलाखत सोबत, कुमार केतकर यांची प्रस्तावना व अरुण साधू यांची सांगता...

मूल्य ३०० रुपये, सवलतीत १८० रुपये

# ओपन एण्डेड विचारधन..

## विनायक वैद्य

श्री. चंद्रसेन टिळेकर यांची 'विचारान्ती' व 'हसण्यावारी नेऊ नका' ही दोन पुस्तके नुकतीच प्रसिद्ध झाली आहेत. पैकी 'विचारान्ती' हे पुस्तक सरळसरळ वैचारिक स्वरूपाचे आहे तर 'हसण्यावारी नेऊ नका' हे वरपांगी विनोदी म्हणून लिहिलेले असले तरी त्यातला विनोद जरा बाजूला केला तर तेही पुस्तक वैचारिकच आहे हे स्पष्ट होते.

'विचारान्ती' या पुस्तकात टिळेकरांनी बिनधास्तपणे काही विषयावर आपले विचार मांडले आहेत. केवळ विचार नव्हे तर समाजाने तसा अंगिकारही करावा असा त्यांचा आग्रह दिसतो. काही उदाहरणे वानगीदाखल देता येतील. 'गुरुचरित्र- निमित्तमात्र' या लेखात ते लिहितात, 'हा ग्रंथ अशिष्ट स्वरूपाचा आहे. याची पारायणं थांबली पाहिजेत.' 'उतारवयातील सहजीवन' या लेखात ते बिनदिक्कतपणे म्हणतात, की 'एकाकी रहाणाऱ्या स्त्री-पुरुषांनी खुशाल विवाह न करता एकत्र राहवे. नातेवाईकांची, मुलांची, समाजाची अजिबात पर्वा करू नये.' 'त्रिकोणी संसार' या लेखातले विचार तर नक्कीच वादळी आहेत. या लेखात ते म्हणतात की, 'द्वि-भार्या बंदी' कायदा स्त्रियांवर अन्याय करणारा आहे. एखाद्या कुटुंबात जर द्वि-पत्नी स्वीकारार्ह असेल तरी कायद्यामुळे तसे करता येत नाही; त्यांच्या मते, महाराष्ट्रात लाखो स्त्रिया परित्यक्तेचं भयाण जीवण जगताहेत. एखाद्या कुटुंबात जर त्यांचा 'दत्तक पत्नी अथवा द्वितीय पत्नी' म्हणून स्वीकार होत असेल तर ते त्या स्त्रियांच्या जीवनात नंदनवन फुलवणारं उरणार नाही काय? लेखकाचा हा सवाल आणि परित्यक्तांच्या पुनर्वसनाचा पर्याय वरवर बिनतोड वाटत असला तरी खरोखर तसे करण्याने किती संसार त्यानंतर सुरळीत चालतील आणि किती उधळले जातील याचाही विचार व्हावयास हवा. या लेखात तरी लेखकाने तसा केला आहे असे दिसत नाही. पंढरपूरच्या वारीचे स्वरूप ते 'वारीचे कौतुक कशाला' या लेखात जे मांडतात; त्याचा विचार, वारीला जाणाऱ्यांनी आणि दुरून गंमत पाहणाऱ्यांनी ही गंभीरपणे करावा असे मात्र तो लेख वाचल्यावर वाटते. वारीच्या दिवसांत गावोगावी लहान मुलांना धोतरं नेसवून, हाती चिपळ्या देऊन ज्या दिंड्या काढल्या जातात त्याला टिळेकर जोरदार आक्षेप घेतात तो योग्यच आहे. या लेखात ते तुम्हा-आम्हाला सरळसरळ सवाल करताहेत की 'असल्या कृत्यातून समाजसुधारक-शास्त्रज्ञ तयार होतील की कीर्तनकार-प्रवचनकार? आपल्या समाजाला नेमकी कशाची गरज आहे?'







'न स्वीकारलेले पु.ल.', 'झोपलेली जागृत देवस्थानं', 'शनी महाराजाचं तैलस्नान', 'श्रेष्ठ संस्कृतीच्या पाऊलखुणा' हे लेख वाचल्यावर वाचक नक्कीच अंतर्मुख होईल, परंतु या पुस्तकातला शेवटचा लेख म्हणजे 'शिवसेनेची गद्दारी' मात्र सगळ्यांनाच अस्वस्थ करून सोडणारा आहे. लेखकाच्या मते, 'हिंदुत्वाचा पुकारा करून शिवसेनेने बहुजन समाजातल्या तरुणांना मध्ययुगात नेऊन सोडलं. तारुण्यानं बुद्धिप्रामाण्यवादाला संपूर्णपणे तिलांजली दिल्यामुळे महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान झाले आहे.' हा आरोप अत्यंत गंभीर आहे. याचा विचार शिवसेनेसह सर्व मराठी माणसांनी करावयास हवा.

चंद्रसेन टिळेकर यांचे दुसरे पुस्तक 'हसण्यावारी नेऊ नका' हे शीर्षकावरूनच गंभीर विनोदाबाबतचे असले पाहिजे याची

शंका येते आणि ते खरेही आहे. टिळेकर यांनी वरपांगी विनोदाचा बाज ठेवून समाजाच्या भरकटलेल्या स्थितीवर घावच घातले आहेत. प्रत्येक कथा-लेखासाठी विनोदाचा वेगवेगळा फॉर्म (बाज) लेखकाने वापरला आहे आणि हे या पुस्तकाचे खास वैशिष्ट्य आहे. टिळेकरांचा मूळचा पिंड धडपड्या सामाजिक कार्यकर्त्याचा आहे. (मुंबईतील ठिकठिकाणचे 'आचार्य अत्रे कट्टे' त्यांनीच निर्माण केले आहेत.) अंधश्रद्धा व इतर प्रबोधनपर विषयांवर त्यांची सातत्याने व्याख्याने होत असतात, साहजिकच हेच विषय त्यांनी धमाल विनोदी पद्धतीन विशेषकरून व्यक्रोक्तीने मांडले आहेत. कधी कधी तर टिळेकर भावना अनावर होऊन विनोदाच पांघरलेल कातड फेकून देऊन सरळसरळ तुमच्यासमोर, सामाजिक कार्यकर्त्यांच्या नाहीतर वक्त्याच्या स्वरूपात उभे ठाकतात. 'पॉलिग्राफ, शपथ खरं सांगेन' हा लेख त्याचा उत्तम पुरावा म्हणून देता येईल. या लेखात सुरुवातीस ते नव्याने मंत्री झालेल्याची झकास खिल्ली उडवतात, पण तितक्यात ते त्याच मंत्र्याच्या तोंडून, 'मी अजिबात समाजाची सेवा करायला आलेलो नाही' असे सांगून 'दानाप्रमाणे सेवाही सत्पात्रीच करायची; असे आपल्याला ऐकवतात. मंत्र्यावर भ्रष्टाचाराचे आणि इतर आरोप करताना आपण सर्वही त्याच माळेचे मणी आहोत हे जेव्हा टिळेकर त्या मंत्र्याच्या तोंडून आपल्याला ऐकवतात, तेव्हा आपल्याला आत्मपरीक्षण केल्याशिवाय राहणे अशक्य ठरावे.

'खोटं भविष्य सांगणार' हा लेख म्हणजे विनोदाचा आगळा नजराणा. टिळेकरांचा हा ज्योतिषी खरे भविष्य सांगण्याऐवजी खोटे भविष्य सांगण्याची हमी देतो आणि त्याबद्दल अधिक पैसे घेतो. त्याने वर्तवलेली खोटी भविष्ये पाहा, 'मुंबईच्या दुरवस्थेबद्दल यापुढे पालिका सरकारला आणि सरकार पालिकेला जबाबदार धरणार नाहीत.' माध्यमांची खिल्ली उडवताना भविष्य समोर येते, 'स्वत:च्या बायकोला किती दिवस गेलेत याची सुतराम कल्पना नसताना, कोणत्या नटीला किती महिने उलटून गेलेत हे शोधण्याचा उद्योग वांझोटी पत्रकारिता करणार नाही.', 'संडास साफ करण्याच्या पावडरची जाहिरात जेवायच्या वेळेला दाखवणार नाहीत.' राजकीय पक्षांची टोपी ही बेमालूमपणे या लेखात उतरवली आहे. शिवसेनेच्या संदर्भात टिप्पणी अशी, 'शिवसेनेशिवाय मराठी माणसाला वाली नाही या भ्रमात यापुढे मराठी माणसं रहाणार नाहीत', 'निवडणूका आल्या की परप्रांतिय उमेदवार शिवसेनेचा रेल्वे प्लॅटफॉर्मसारखा वापर करतात अन निवडून आल्यावर टुणकन उडी मारून दुसऱ्या पक्षात जातात हे लक्षात घेऊन शिवसेना यापुढे परप्रांतीयांना तिकिटे देणार नाही. मराठी माणसाशिवाय आपल्याला वाली नाही याचे भान शिवसेनेला येईल.' आणखीही अनेक मजेदार खोटी भविष्ये या लेखात आहेत, ती एकाच वेळी ओठावर हसू आणि मनात उद्वेग निर्माण करतील. या पुस्तकातील आणखी उल्लेखनीय कथा/लेख म्हणजे, 'कुंभार व्हा, गाढवांना तोटा नाही', 'ज्योतिबा फुले हाजिर हो', 'पिल्या दादा जेव्हा समाधी घेतो' इत्यादी.

या विनोदी पुस्तकाद्वारे टिळेकरांनी मराठी साहित्यात उत्तम विनोदाची भर घातली आहे यात शंकाच नाही. प्रसिद्ध लेखक राजन खान या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''मराठीतलं विनोदी लेखन फाफलून गेलंय असं मला वाटत होतं. पण चंद्रसेन टिळेकरांचं हे विनोदी लेखन वाचलं आणि तृप्त तृप्त वाटलं. खूप दिवसांची तहान भागल्यागत झालं. किती साध्या साध्या गोष्टींमधून माणसाचं जीवन आणि समाजाचंही सुधारू शकतं न् आनंदी करू शकतं ते आपल्याला टिळेकरांचा विनोद सांगतो. विनोदातून प्रबोधन हे सगळ्यांनाच जमण्यासारखं नाही. चंद्रसेन टिळेकरांना ते उत्तम जमलंय. चंद्रसेन टिळेकर जर सातत्यानं असं लिखाण करीत राहिले तर मराठी विनोदी साहित्यात जो रखरखीत दुष्काळ पडलाय, त्यात एक आश्वासक ओलावा निर्माण करतील याबद्दल माझ्या मनात तरी शंका नाही.''

'हसण्यावारी नेऊ नका' या पुस्तकातील विनोदावरून मी राजन खान यांनी टिळेकर यांच्याकडून जी अपेक्षा व्यक्त केली आहे. तशीच काहीशी 'विचारान्ती' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दिनकर गांगल यांनी केली आहे; ते म्हणतात, ''ज्या महाराष्ट्रात जांभेकरांपासून आंबेडकरांपर्यंत विचारप्रबोधकांची मालिका निर्माण झाली, त्याच प्रदेशात आता मात्र बुद्धिमांद्य आलं आहे. तेव्हा समाजाला हे टिळेकरांचं लिखाण पचणारं नाही. असं असलं तरी अशा प्रकारचं खुलं; ओपन एंडेड विचारधन समाजाला हवं आहे. कारण अशा वैचारिक मंथनातून काही पर्याय मिळू शकतील अशी अपेक्षा आहे.''

अगदी स्पष्ट शब्दात चंद्रसेन टिळेकरांच्या या दोन पुस्तकांतील लिखाणाबद्दल सांगायचे झालं तर हेच निर्विवादपणे सांगावे लागेल, 'आपल्या यश-अपयशाचं मूळ देव-धर्म, संत-महंत, बुवा-बापू, स्वामी-महाराज यांच्या चरणी लागून अथवा त्यांच्या मठात-आश्रमात ध्यान लावून कळणार नाही तर चंद्रसेन टिळेकरांसारख्यांच्या प्रखर बुद्धिवादी लिखाणातूनच काही मार्ग मिळू शकतो. 'हसण्यावारी नेऊ नका' अन् 'विचारान्ती' ही दोन्ही पुस्तके मराठी माणसाच्या घरात असायलाच हवीत.

**– विनायक वैद्य**
माजी संचालक, गरवारे इन्स्टिट्यूट,
कालिना, मुंबई.

# ठाणे ग्रंथाली वाचक दिन वृत्तांत

एखादं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून माणूस काहीतरी खटपट करीत असतो. आणि ते साध्य होतंय असं दिसलं तर सार्थकतेची भावना त्या व्यक्तीला येते. अशी भावना अनुभवली, सुधीर थत्ते व नंदिनी थत्ते या दाम्पत्याने.

२ व ३ जानेवरी, २०१० रोजी ठाण्यामध्ये ग्रंथाली - ठाणे केंद्राचा तेरावा 'वाचक दिन' साजरा झाला. ठाणे येथे साजरा होणारा ग्रंथालीचा वाचक दिन हा शालेय मुलांसाठी असतो. मुलांमध्ये वाचनाची गोडी उत्पन्न व्हावी. विविध विषयांच्या पुस्तकांची ओळख मुलांना व्हावी यासाठी ग्रंथाली(ठाणे केंद्र) दरवर्षी वाचनाशी निगडित नवनवीन कल्पना राबवीत असते. ठाण्यातील अनेक शाळा या उपक्रमात सहभागी होतात. दरवर्षी एक वेगळी कल्पना मुलांसमोर ठेवली जाते. उदा.- एके वर्षी डॉ. नरेंद्र जाधव लिखित 'आमचा बाप आणि आम्ही' या पुस्तकातील प्रसंग मुलांनी प्रत्यक्ष व्यासपीठावर नाट्यरूपाने सादर केले.

या वर्षी 'नोबेल नगरीतील नवलस्वप्ने' या सुधीर व नंदिनी थत्ते यांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या मालिकेतील एक एक पुस्तक एकेका शाळेला दिले गेले. विद्यार्थ्यांच्या गटाने त्या पुस्तकातील कोणतेही एक संशोधन - जे गोष्टीरूपाने लिहिलेले आहे - कोणत्याही माध्यमातून स्टेजवर सादर करायचे होते.

स्वीडनमध्ये दिल्या जाणाऱ्या नोबेल पारितोषिकाला जागतिक पातलळीवर खूपच प्रतिष्ठा आहे. शांतता, साहित्य, वैद्यकशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र अशी शास्त्रे यामध्ये मोठी कामगिरी व संशोधन करणाऱ्यांना दरवर्षी हे पारितोषिक दिले जाते. हे संशोधन अर्थातच खूप वरच्या पातळीवरचे असते.

सर्वसाधारण माणसाला व लहान विद्यार्थ्यांनाही विज्ञानातल्या संकल्पना समजल्या पाहिजेत. असा विचार BARC (भाभा अणुशक्ती अणुसंधान केन्द्र)मध्ये असलेल्या श्री. थत्ते यांच्या मनात आला. त्या संकल्पना जर मराठीतून व कथांमधून सांगितल्या तर सर्वांना कळतील व आवडतील या विचाराने १९९६ पासून, ज्या संशोधनाला नोबेल पारितोषिक मिळाले आहे, त्या शोधा संबंधीची माहिती कथेद्वारे श्री. व सौ. थत्ते यांनी लिहायला सुरुवात केली. विषय सोपा करून, कधी रूपक वापरून तर कधी संवादातून कथा लिहायला सुरुवात झाली. त्यांच्या या कल्पनेला साकार केले ग्रंथालीने. ऑक्टोबर मध्ये नोबेल पुरस्कार जाहीर झाली की ते संशोधन थत्ते दाम्पत्य दोन महिन्यात कथारूपाने मांडते व ग्रंथाली २५ डिसेंबर रोजी ते पुस्तकरूपाने प्रकाशित करते. 'लोकांपर्यंत विज्ञान नेण्याचा अभिनव उपक्रम' असा खुद्द नोबेल विजेत्यांचा अभिप्राय आहे. त्याही पुढे, मुलांच्या मनात ही वैज्ञानिक शोधांची कहाणी ठसविण्याचे काम केले ते ग्रंथालीच्या ठाणे केंद्राने.

ग्रंथालीचे ठाणे केंद्राचे दोन खंदे कार्यकर्ते श्री. अविनाश बर्वे व श्री. श्रीधर गांगल यांनी जून ०९ मध्येच जानेवारी २०१० च्या 'वाचकदिनाचा' विषय ठरवला. केवळ ललित साहित्याची नव्हे तर विज्ञानाची ओळख मुलांना साहित्यातून व्हावी या उद्देशाने 'नोबल नगरीतील नवलस्वप्ने' ही पुस्तके ठरवली गेली. या पुस्तकांच्या लेखकांनाच पहिल्या सभेसाठी आमंत्रित केले गेले. तेव्हापासून ते विद्यार्थ्यांचे कार्यक्रम प्रत्यक्ष सादर होईपर्यंत थत्ते दाम्पत्याने मनापासून या प्रक्रियेत सहभाग घेतला.

ठाणे-पूर्व येथील पी.ई. सोसायटीच्या इंग्लिश मीडियम शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त या शाळेने यंदा यजमानपद स्वीकारले.

२ जानेवारी, २०१० रोजी औपचारिक उद्घाटनानंतर नोबेल विजेत्या शोधांवर आधारित कथा या नाटक, नृत्यनाट्य, पोवाडा, कीर्तन अशा स्वरूपात व्यासपीठावर सादर केल्या गेल्या. १७ शाळांनी यात भाग घेतला होता. पहिल्या दिवशी म्हणजे २ जानेवारी रोजी दोन वेगवेगळ्या व्यासपीठांवर सादरीकरण केले गेले. त्यातील ६ निवडक कार्यक्रम ३ जानेवारी रोजी पुन्हा सादर झाले. कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी ग्रंथालीचे श्री. दिनकर गांगल हे सपात्निक उपस्थित होते. त्यांची उपस्थिती कार्यकर्त्यांना प्रोत्साहित करणारी ठरते.

सर्व शाळांनी पाचपासून, अगदी चाळीसपर्यंतचे विद्यार्थ्यांचे गट करून वेगवेगळ्या कल्पना/पद्धती वापरून आपापले कार्यक्रम सादर केले. या मागे त्यांच्या शिक्षकांची मेहनत नक्कीच होती.

२००५ सालचे रसायनशास्त्राचे नोबेल पारितोषिक डॉ. खेस चाडविन, डॉ. रॉबर्ट एच. ग्रब्स व डॉ. रिचर्ड आर. श्रॉफ यांना 'कार्बनी संश्लेषणातील विपर्यय पद्धतीच्या विकासासाठी' विभागून देण्यात आले. 'रेणूरहस्याच्या शोधात' या शीर्षकाची कथा सादर केली 'सरस्वती सेकंडरी स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी. या नाटिकेची सुरुवात रसायनरत्न पुरस्काराची

घोषणा करण्यासाठी दवंडीने करण्यात आली. दोन मित्रांनी अणुवाडीचा नकाशा मिळवला, त्यांना चार हातांचे कर्बकाका भेटले हातात हात घातलेली रेणूंची जोडगोळी दिसली ते नृत्य बघायला गेले धातूमय उत्प्रेरकांनी रेणूंनी तोडणी व जोडणी कशी करता येईल हे दाखविण्यासाठी स्टेजवर सुरेख नृत्य सादर झाले. नेटक्या सादरीकरणामुळे विषय प्रेक्षकांपर्यंत नीट पोचला.

१९९७ सालचा रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्काराचा अर्धा भाग डॉ. जेन्स स्कॉऊ यांना व उरलेला अर्धा भाग डॉ. पॉल बॉयर व डॉ. जॉन्स स्कॉऊ यांना व उरलेला अर्धा भाग डॉ. पॉल बॉयर व डॉ. जॉन वॉकर यांना समान विभागून देण्यात आला. 'पी.ई. सोसायटीच्या इंग्लिश मिडियम शाळेने' 'जैवऊर्जेचे रहस्य' हा विषय मांडला. शोधाचे प्रास्ताविक थोडक्यात केले. अभिनय व संवादातून विषय सांगितला. प्रोजेक्टरवर मायटोकॉंड्रियाचे कार्य स्लाइड्स द्वारे दाखवून एकीकडे स्पष्टीकरण केले. ड्रेपरीचे अवडंबर केले नाही.

२००४ सालचे शरीरशास्त्राचे नोबेल पारितोषिक डॉ. रिचर्ड ॲक्सेल व डॉ. लिंडा बक यांना विभागून देण्यात आले. गंधकोषिका व घ्राणेंद्रिय संस्थेची संरचना शोधून काढल्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले.

'गंधरेणूंचे गुपित' ही कथा पुस्तकामध्ये मावशी-भाची यांच्यातील संवादातून मांडली आहे. मात्र सरस्वती शाळेच्या निवृत्त शिक्षिका सौ.नंदिनी बर्वे यांनी या कथेचे रूपांतर कीर्तनात केले. हे कीर्तन सादर केले 'न्यू कळवा हायस्कूल'च्या विद्यार्थ्यांनी. ज्या मुलींनी कीर्तन कधीही बघितले, ऐकले नव्हते अशा दोन मुलींनी सुरेख पाठांतर करून कीर्तनकाराच्या वेषात फार छान कीर्तन केले त्यासाठी श्री. श्रीकांत बर्वे सर यांनी मेहनत घेतली. कीर्तनाचा प्रसंग दाखवताना श्रोते म्हणून व्यासपीठावर बसलेल्या त्याच शाळेच्या इतर विद्यार्थ्यांना चांगली साथ दिली. पेटी, तबल्याची साथ, कीर्तनकारांच्या हातातल्या चिपळ्या यामुळे कीर्तनाची रंगत वाढली. ज्ञानेंद्रियांशी संबंधित 'शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध' यांचे आपल्या जीवनातील महत्त्व, त्याबाबतचे संशोधन, गंधकोषिकांचे कार्य ही सर्व माहिती उत्कृष्ट लेखन व सादरीकरण यामुळे सगळ्यापर्यंत पोचली.

'हेचि दान दे विज्ञाना/तुझा विसर न व्हावा
न लगो रोग आणि आपदा/आरोग्यसंग देई सदा
तुका म्हणे या भूलोकी/सुखी ठेवावे सर्वांसी....'

हा अभंग गाऊन व 'नोबेलनगरी की जय...' 'कळवा हायस्कूल की जय...' अशा

# गीत रामायणाचे रंगतदार सादरीकरण

श्री समर्थ सेवक मंडळ व ग्रंथाली यांच्या समन्वयातून 'बालमुखातून गीत रामायण' हा आगळा-वेगळा कार्यक्रम सादर झाला. महाराष्ट्राचे वाल्मिकी म्हणून नावलौकीक मिळवलेले ग.दि.माडगुळकर यांचे अवीट गोडीचे गीतरामायण आणि तितक्याच ताकदीने महाराष्ट्राच्या घराघरात ते पोहोचवणारे शब्दप्रभू सुधीर फडके यांचे संगीत म्हणजे एक दुग्धशर्करा योगच अशा अवीट गोडीच्या गीतरामायणाचा विद्यार्थ्यांनी आस्वाद घ्यावा, शब्दातील, स्वरांतील माधुर्य समजून घ्यावे या हेतूने 'ग्रंथाली'ने ठाण्यातील शाळांमध्ये जाऊन प्रत्येक शाळेने दोन गीते सादर करावी असा प्रयत्न केला व त्याला भरघोस यश मिळाले. हा आगळावेगळा कार्यक्रम १२ आणि १३ डिसेंबर २००९ रोजी 'समर्थ सेवक मंडळाच्या समर्थ मंदिर' या वास्तूत संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ठाणे जनता सहकारी बँकेचे महाव्यवस्थापक श्री रविंद्र कर्वे यांचे हस्ते झाले. याचवेळी जनकल्याण सहकारी बँकेचे व्यवस्थापक श्री.ओरपे. समर्थ सेवक मंडळाचे उपशास्ता श्री. सुरेन्द्र लागू, ग्रंथालीच्या विश्वस्त श्रीमती लतिका भानूशाली तसेच शिवसमर्थविद्या (प्राथ.)च्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती तारामती घांगुर्डे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. ग्रंथालीच्या स्थापनेपासून आजपर्यंत कार्यरत असलेले श्री. श्रीधर गांगल यांनी ग्रंथाली प्रकाशनाचे पुस्तक भेट म्हणून देऊन मान्यवरांचे स्वागत केले. श्री. रविंद्र कर्वे, श्री. ओरपे आणि श्री. लागू यांनी या उपक्रमात सहभागी असणाऱ्या सर्वांचे कौतूक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. सौ. शिल्पा टेंबे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसमर्थ विद्या उपमुख्याध्यापिका सौ. वर्षा ओक यांनी केले आणि नंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहेऱ्यावर आनंद, उत्साह दिसत होता. शिवसमर्थच्या विद्यार्थ्यांनी 'स्वयेश्री रामप्रभू ऐकती....' व 'शरयूतीरावरी अयोध्या मनूनिर्मित नगरी.....' या गाण्यांनी अतिशय सुरेख सुरुवात करून श्रोत्यांची मने जिंकून घेतली. आणि पुढे एकामागून एक गाण्यांची मैफल रंगतच गेली. शनिवार आणि रविवार हे दोन दिवस विद्यार्थ्यांनी समरसून कार्यक्रमात भाग घेतला. काही वेळेला गाण्यांना वाद्यांची साथ नसून सुद्धा सुंदर सादरीकरण केले. सहभागी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते पुस्तक भेट दिले. दोनही दिवसाचे सूत्र संचलन सौ. सविता शैलेन्द्र कळके यांनी केले. एकूणच कार्यक्रम अप्रतिम झाला.

जयघोषाने कीर्तनाची सांगता झाली. शास्त्रातील संशोधन सोपे करून लोकांसमोर मांडण्याचा हा उत्कृष्ट नमुना होता. सर्व प्रेक्षकांनी खूप दाद दिली.

३ जानेवारी रोजी निवडक सहा कार्यक्रम झाल्यानंतर आरती थत्ते यांनी 'नोबेल...स्वप्ने' या पुस्तकांच्या संदर्भातील छोटेसे ॲनिमेशन विद्यार्थ्यांना दाखवले. 'विज्ञान सोपे करणे ही विज्ञानातील परीची भूमिका असून ज्ञानसोपानाच्या वरच्या वरच्या पायरीवर जाण्याची दिशा परीने दाखवली आहे' असे त्यात दाखवले गेले. यानंतर झालेल्या समारोपाच्या छोट्याशा समारंभात सौ. नंदिनी थत्ते यांनी उल्हासित होऊन आपले मनोगत व्यक्त केले. सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक करून नेमक्या शब्दात प्रत्येक प्रयोगाचा आढावा घेतला. प्रत्येक प्रयोगाच्या सादरीकरणातील वैशिष्ट्ये त्यांनी सांगितली. त्यांचे लेखन ग्रंथाली ठाणे केंद्राने विद्यार्थ्यांमार्फत प्रत्यक्ष साकार केले म्हणून कार्यकर्त्यांना दाद दिली.

मोठे शास्त्रीय संशोधन शालेय मुलांना कळण्याच्या पातळीवर आणणे हा हेतू ज्यांनी प्रत्यक्षात आणला त्यांचे विद्यार्थ्यांसाठीचे भाषण अर्थातच त्यांना समजेल व आवडेल असेच झाले. श्री. सुधीर थत्ते यांनी छोट्याछोट्या गोष्टी सांगून, गमतीशीर उदाहरणे देऊन विज्ञानाचे महत्त्व मुलांस समजावले. विमान उंच नेऊन त्यास पुढे नेतो तो 'वैमानिक' याच चालीवर विज्ञान उंच नेऊन त्यास पुढे नेतो तो 'वैज्ञानिक' अशी सोपी व्याख्या केली. 'निरीक्षण करणे, निष्कर्ष काढणे, नियम बनवणे. तो बरोबर की चूक ते तपासणे....' अभ्यासाच्या अशा पद्धतीचे महत्त्व श्री. थत्ते यांनी सांगितले. नोबेल पारितोषिक हे स्फूर्ती देणारे पारितोषिक असल्याचे त्यांनी सांगितले.

ही पुस्तके वाचण्याची श्रोत्यांची उत्कंठा तर वाढलीच शिवाय दोन दिवस सादर झालेल्या 'या नाटिकांमुळे अभ्यासक्रमातला विषय अधिक चांगला समजला व तो कायम लक्षात राहील' अशी विद्यार्थ्यांकडून आलेली प्रतिक्रिया ही ग्रंथाली ठाणे केंद्राच्या कार्यकर्त्यांच्या कल्पनेला, धावपळीला व कष्टांना मिळालेली पावतीच नव्हे का?

**– सुचेता शा. दामले**
१३, शांता निवास,
कर्वे हॉस्पिटलच्या समोर,
नौपाडा, ठाणे.
फोन : २५४१५३६७
मोबाइल : ९९६९०८५६७४

'मूकं करोति वाचालम्' हे आपण ऐकून असतो. मात्र हा केवळ दैवी चमत्कार नसतो. व्यक्ती मुकी का होते आणि तिला बोलते कसे करता येते, यामागे शास्त्र असते; पण त्यापेक्षा असते प्रचंड मेहनत आणि त्यांना माणूस म्हणून दिलेला प्रेमळ आधार. मुंबईत कर्णबधिरांसाठी शाळा काढून रोहिणी लिमये यांनी अनेकांना मुकेपणापासून मुक्ती देऊन व्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिली. कर्णबधिरांसाठी शाळा सुरू केली, उपयुक्त अभ्यासक्रम आखले. श्रवण, वाचा व भाषाविष्कारासाठी विविध साधनांची निर्मिती केली. त्यांच्यातला माणूस घडवला. या अथक परिश्रमांचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव झाला. स्वत मूक राहून, आपल्या योगदानातून बोलणाऱ्या ध्यासाची कहाणी म्हणजे 'मौन होई बोलके.'

**मौन होई बोलके**
**रोहिणी लिमये**



**मूल्य २०० रुपये, सवलतीत १२० रुपये**

# अमेरिकेच्या विविधतेमधील एकता

**डॉ. विजय वि. जोशी**

*सहजी दुभंगू शकणाऱ्या भारतीय समाजाला आधुनिक राष्ट्रबांधणीसाठी गरजेच्या असलेल्या सामाजिक एकतेची जाण आणून देण्याचा एक प्रयत्न.*

जवाहरलाल नेहरूंना भारतातील विविधतेत दिसलेली एकता - युनिटी इन डायव्हर्सिटी - आज व्यवहारात विशेष अनुभवास येत नाही. बऱ्याच बाबतींत त्याच विविधतेच्या मुद्यांच्या वापरातून समाज दुभंगणे, विभाजन साधणे सोयीचे जाते. ह्या पार्श्वभूमीवर अमेरिका एक राष्ट्र म्हणून - प्रगत राष्ट्र म्हणून पुढे जाताना नजरेस येते. अमेरिकेतील आजची प्रजा खरे तर 'एक कडबोळच' मानता येईल. वंश, धर्म, रंग, भाषा - प्रकार सांगा; आणि ती विविधता अमेरिकेत अस्तित्वात आहे. मात्र ती देशाच्या, तेथील नागरिकांच्या प्रगतीच्या, विकासाच्या आड येताना, आज तरी, दिसत नाही. कदाचित, 'दुरून डोंगर साजरे' ह्या वाक्प्रचाराचा तो प्रत्यय असेल.

जवळपास अर्धशतकापूर्वी अमेरिकेत स्थायिक झालेले माझे स्नेही आणि तत्त्वज्ञानाचे अभ्यासक डॉ. विजय जोशी ह्यांना मी विनंती केली होती की त्यांनी प्रस्तुत निरीक्षणावर प्रांजळ मतप्रदर्शन करावे. पुण्यातून वैद्यकीय शिक्षण घेतलेले आणि वर्ष-दोन वर्षांतून दोन-चार महिन्यांसाठी भारतात येणारे डॉ. जोशी भारतातील अद्ययावत घडामोडींशी सुपरिचित आहेत.

हेतू असाही आहे की त्यांच्या विश्लेषणातून नेहरूंचे उपरोक्त विधान आजच्या भारतीय समाजाच्या व्यवहारांत प्रत्यक्षात उतरण्याकरता जाणवलेल्या सामाजिक एकतेच्या उणिवेवर विचार व्हावा आणि जाणकारांनी संशोधन करून उपाययोजना साधण्याच्या प्रयत्नाला वाचा फुटावी.

ह्या पार्श्वभूमीवर सादर झालेले डॉ. जोशींचे विचार म्हणजेच प्रस्तुत लेख.

**- सु.गो. तपस्वी, पुणे**
अध्यक्ष, जनसंवाद
भ्रमणध्वनी - ९७६६१५२२५३

**प्रास्ताविक**

अमेरिकेचे नागरिक बहुरंगी आहेत हा विचार विविधतेच्या संदर्भात सर्वप्रथम मनात येतो. अशा पांढरा, काळा, तांबडा (मूळचे रेड इंडियन), तपकिरी (भारतीय उपखंड व दक्षिण अमेरिकेतून आलेले) आणि पिवळा ह्या; विविध रंगांच्या त्वचेच्या अमेरिकनांमध्ये श्वेतवर्णीय नागरिकांची संख्या नजरेत भरते आणि अमेरिकन म्हणजे श्वेतवर्णीय असे गणित मनात तयार होते. ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहता, अमेरिकेतील मूळचे वसाहतकार बहुसंख्य युरोपीय वंशाचे आणि पाश्चात्त्य संस्कृतीचे अनुयायी असल्यामुळे अमेरिका म्हणजे पाश्चात्त्य देश आणि समाजाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक वा शैक्षणिक विचारसरणीच्या दृष्टिकोनातून वसाहतकारांचे प्रमाण वाढते आहे. इ.स. २००६ मध्ये श्वेतवर्णियांचे प्रमाण ७४ टक्के होते ते २०५० मध्ये ५० टक्क्यांवर येईल, असे भाकित केले जाते. असे होणार असले तरी अमेरिका हरप्रकारच्या विविधतेला सामावून घेणारा आणि पाश्चात्त्यसंस्कृतिप्रधान व पुरोगामी विचारसरणीचा देश राहील असे म्हणणे अयोग्य ठरू नये. ह्या लेखात धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक व भाषिक विविधतेच्या पार्श्वभूमीवर सामाजिक क्षेत्रातील एकतेसंबंधी निवेदन केले आहे.

**ह्या लेखातील संज्ञांच्या व्याख्या**

'विविधता' म्हणजे विषमता नव्हे; आणि निश्चितच वरिष्ठ वा कनिष्ठ असा भेदभाव नव्हेच नव्हे. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये केवळ विविध वैशिष्ट्ये किंवा चालीरीती असा अर्थ अभिप्रेत आहे.

'एकता' म्हणजे विविध पार्श्वभूमीच्या व वैशिष्ट्यांच्या नागरिकांनी मत्सर, द्वेष वा पूर्वग्रह न बाळगता एकमेकांबद्दल समंजसपणा, विश्वास व आदर दाखवणे. एकता म्हणजे एकसाचेपणा किंवा आदर्शत्वाचा परमोच्च बिंदू असलेली संपूर्ण व दृढ एकात्मता नव्हे. व्यावहारिक व व्यावसायिक एकता निराळी, ती बऱ्याच वर्तणुकीत इतर देशांतही अनुभवास येते. परंतु, एकता ही संज्ञा ह्या लेखात सामाजिक क्षेत्रापुरती मर्यादित मानली आहे; 'कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या व्यक्तिगत जीवनशैलीचे स्वातंत्र्य राखून सामाजिक स्तरावर विकास साधण्यात एकतेने कार्यशील राहणे' असा अर्थ अभिप्रेत आहे.

**धार्मिक विविधता**

इसवी सन १६२० पासून सुमारे दीडशे वर्षे धर्मभेद व धार्मिक छळापासून मुक्तता मिळण्यासाठी इंग्लंडमधून अमेरिकेत आलेले मूळचे वसाहतकार हे प्रॉटेस्टंट पंथाचे ख्रिश्चन होते. त्या सर्वांची धार्मिकता मूलतत्त्वांच्या दृष्टीने समान असली तरी त्यांच्यात विशिष्ट धार्मिक शिकवण व चालीरीती असलेले प्युरिटन, अँग्लिकन, क्वेकर व प्रेसब्रिटेरिअन

हे चार उपपंथ होते. हे सर्व उपपंथीय इंग्लंडमध्ये असताना एकमेकांच्या विरोधी भूमिका घेत असले किंवा असत तरी नव्या अज्ञात देशात स्थायिक होताना सर्वजण त्यांची विविधता शाबूत ठेवून एकतेने राहू लागले. १७७६ साली स्वातंत्र्य मिळवून अमेरिका हे स्वायत्त राष्ट्र प्रस्थापित झाले. त्यानंतर, एकोणिसाव्या शतकात आणि विसाव्या शतकाच्या आरंभाला कॅथलिक ख्रिश्चन, उपपंथीय प्रॉटेस्टंट व ज्युइश प्रचंड संख्येने अमेरिकेत आले. मात्र, तोपर्यंत धर्म आणि राजकारण ह्यांतील द्वैत प्रस्थापित झाल्यामुळे लाभलेल्या स्वातंत्र्यातून 'सर्वांना स्वत:च्या धर्माप्रमाणे व्यक्तिगत जीवन जगण्याची मुभा' हे तत्त्व अमेरिकनांच्या मनात व वागणुकीत रुजू लागले होते. त्यानंतर विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आशियातून बौद्ध, हिंदू व मुस्लिम हे सुद्धा मोठ्या संख्येने अमेरिकेत स्थायिक होऊ लागले. सांप्रतच्या काळात विविध धर्मीयांची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे; प्रॉटेस्टंट (५१), कॅथलिक (२४), ज्यू (१.७), बौद्ध (०.७), इस्लाम (०.६), हिंदू (०.४), व निधर्मी (१६).

धार्मिक विविधता असूनही अमेरिकनांच्या विचारसरणीत प्रत्येक नागरिकाच्या धार्मिक स्वातंत्र्याचे तत्त्व ठामपणे प्रस्थापित झाले आहे आणि कोणत्याही प्रकारचा धार्मिक, राजकीय अथवा सामाजिक संघर्ष न करता प्रत्येक जण स्वत:च्या धर्माचे पूर्णत: पालन करू शकतो. उत्तम उदाहरण म्हणजे अतिअल्पसंख्यांक असूनही अमेरिकेत सर्व भागांमध्ये नव्याने प्रस्थापित झालेली हिंदूंची मंदिरे व मुसलमानांच्या मशिदी. ह्या धार्मिक स्वातंत्र्यामुळे व समंजसपणामुळे धार्मिक कारणांवरून संघर्ष करण्यात वेळ, श्रम व पैसा ह्यांचा अपव्यय न करता अमेरिकन समाज आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी, विकासासाठी एकतेने प्रयत्नशील राहतो.

**वांशिक विविधता**

अमेरिकेत बहुरंगी विविधता भरपूर आहे हे लोकसंख्येच्या पुढील टक्केवारीनुसार दृष्टोत्पत्तीस येते; श्वेतवर्णीय – ज्यात अरब व स्पॅनिश ह्यांचाही समावेश होतो (७४), कृष्णवर्णीय (१३.५), दक्षिण अमेरिकेतून आलेले हिस्पॅनिक – स्पॅनिश व रेड इंडियन अशा मिश्र वंशाचे (७.४), आशियाई – चीन, भारतीय उपखंड, फिलीपिन्स, इत्यादी देशांतून आलेले (४.४) व अमेरिकेतील मूळचे रेड इंडियन (०.८).

भूतकाळात, श्वेतवर्णीय अमेरिकन कृष्णवर्णियांशी व इतर अल्पसंख्य अमेरिकनांशी भेदभावाने वागल्यामुळे सामाजिक एकतेची भावना रुजत नव्हती व त्यामुळे तुरळक आंतरवांशिक दंगली आणि संघर्ष उद्‌भवत असत; भेदभावासंबंधी अल्पसंख्याकांच्या मनात राग धुमसत असे. पण पुरोगामी राज्यघटना (कॉन्स्टिट्युशन) व सुधारणावादी कायदे ह्या दोन गोष्टींमुळे सामाजिक परिस्थितीत सुधारणा साधली गेली. गुलामगिरीचे उच्चाटन, रेड इंडियनांना मर्यादित स्वायत्तता, सर्वांना समान संधी देणारे मानवी हक्कांसंबंधीचे विविध कायदे, दारिद्र्यनिर्मूलन समान शैक्षणिक संधी – वगैरे साधणारा 'महान समाज' (ग्रेट सोसायटी) हा प्रकल्प, अशी अनेक उदाहरणे ह्या संदर्भात नमूद करता येतील. दीर्घ काळ राबवलेल्या ह्या सकारात्मक धोरणांचा मुख्य फायदा म्हणजे श्वेतवर्णियांच्या मनातील भेदभावाच्या वृत्तीत साधले गेलेले परिवर्तन, जोपासला गेलेला समंजसपणा व सर्वांना समान अधिकार असायला हवेत ह्या तत्त्वाची जाणीव; जोडीला, उपरोक्त कायद्यांमुळे व आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीमुळे कृष्णवर्णियांचे मध्यम वर्गात मोठ्या संख्येने झालेले पदार्पण.

असे म्हटले जाते की अमेरिका म्हणजे अनेक वंश आणि विविध संस्कृती वितळवणारे एक प्रचंड पात्र (मेल्टिंग पॉट) आहे. तरीही, काकडी, टॉमेटो, गाजर, कांदा इत्यादींच्या मिश्र कोशिंबिरीतील प्रत्येक वेगवेगळ्या फोडीप्रमाणे अमेरिकन नागरिक स्वतंत्र अस्तित्व राखून असतात.

आंतरवांशिक तेढ संपूर्णत: नष्ट झाली असे म्हणता येणार नसले तरी अमेरिकन समाज निश्चितच एकतेच्या दिशेने वाटचाल करतो आहे, गेल्या ४०ह्र४५ वर्षांत सामाजिक एकतेचे वातावरण अमेरिकेत दृढ होते आहे.

**सांस्कृतिक विविधता**

ऐतिहासिक काळापासून बहुसंख्य असलेले श्वेतवर्णी पाश्चात्त्य संस्कृतीचे अनुयायी आहेत. त्यामुळे अमेरिकेत नव्याने येणाऱ्या लोकांवर, मग ते कुठल्याही संस्कृतीचे असोत, पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव पडतो व त्याप्रमाणे त्यांच्या सामाजिक वर्तनाची जडणघडण होऊ लागते. तत्त्वत: राजकारणात व समाजकारणात धर्मनिरपेक्षता मानल्यामुळे कायद्यांतूनही ती अधोरेखित होते आणि त्याच अनुषंगाने वैयक्तिक व सामाजिक वर्तणूक होते. धार्मिक जीवनातील चालीरीतींचे स्वातंत्र्य शाबूत राहिल्यामुळे पाश्चात्त्य संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर व अमेरिकन नागरिकत्वाच्या कायद्यांच्या चौकटीत व्यक्तिगत जीवनात आपापली उपसंस्कृती (सब-कल्चर) सर्वांना जोपासता येत असल्यामुळे एकतेचे वातावरण निर्माण होण्यास मदत होते.

**भाषिक विविधता**

ऐतिहासिक काळात युरोपमधील विविध भाषिक – इंग्लिश, जर्मन, इटालियन, वगैरे – आणि नंतर स्पॅनिश (हिस्पॅनिक) व एशियन इथे वसाहतीकरिता आले. तुलनेत, टक्केवारीने व खूप मोठ्या संख्येने आलेले मूळचे वसाहतकार इंग्रजी भाषिक असल्यामुळे अमेरिकेत भाषिक विविधता प्रस्थापित झाली नाही– म्हणजे निदान सार्वजनिक क्षेत्रात व रोजच्या व्यवहारांत अशी विविधता आली नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे सर्व वसाहतकारांच्या (व गुलामगिरीच्या पर्वात गुलामांच्या) मुलांना फक्त इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जाई व आजही देण्यात येते. आजच्या अमेरिकेत ९६ टक्के अमेरिकन नागरिक इंग्रजी भाषा बोलू शकतात. अनेक अल्पसंख्य त्यांच्या घरी घरी जरी इतर भाषा बोलतात (उदाहरणार्थ १२% स्पॅनिश व ०.१२% हिंदी) तरी वरील कारणांमुळे अमेरिकेत भाषिक विविधता निर्माण झाली

नाही. सध्या, दक्षिण सरहद्दीजवळ असलेल्या भागात स्पॅनिशमध्ये शिक्षण देण्याची मागणी करण्यात येते आहे- पण त्या मागणीला अमेरिकेत फारसा पाठिंबा नाही.

**प्रादेशिक विविधता**

बहुसंख्य अमेरिकन (८३.६%) छोट्यामोठ्या शहरात राहतात. ग्रामीण भागात राहणाऱ्या अमेरिकनांना सुलभ व आरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा बव्हंशी उपलब्ध असल्यामुळे नागरी- ग्रामीण अशी विविधता इथे प्रकर्षाने दिसत नाही. अर्थात, नागरी आणि ग्रामीण भागातील अमेरिकनांच्या जीवनशैलीत संपूर्ण समानता आहे असे म्हणणे ही योग्य ठरणार नाही.

**भाष्य**

आशियातून येणाऱ्या नवीन वसाहतकारांमुळे अमेरिकेत सांप्रतच्या काळात अधिकाधिक धार्मिक विविधता दिसते. परंतु, ज्याला धार्मिक समंजसपणाच्या दृष्टिकोनामुळे ह्या विविधतेतून संघर्ष निर्माण होत नाही आणि समाजाच्या एकतेला बाधा येत नाही. आंतरवंशीय विवाह जोपर्यंत मोठ्या प्रमाणावर होत नाहीत तोपर्यंत वांशिक विविधता टिकून राहील, पण विविध वंशांच्या अमेरिकनांमध्ये संघर्ष होऊन समाजाच्या एकतेला बाधा येणे असंभवनीय वाटते. बहुसंख्य श्वेतवर्णीय अमेरिकनांच्या मनातील इतरवंशीय अमेरिकनांसंबंधीचे पूर्वग्रह व वरिष्ठहृकनिष्ठ अशी वर्गवारी दिवसेंदिवस लोप पावत आहे हे मी माझ्या ४० वर्षांच्या अमेरिकतील वास्तव्यात पाहिले आहे. संस्कृती वितवळणारे पात्र व मिश्र कोशिंबीर (मेल्टिंग पॉट व सॅलड बाऊल) ह्या उपरोक्त उपमांनुसार मूलभूत पाश्चात्त्य विचारसरणीची पार्श्वभूमी व अमेरिकन नागरिकत्वाची चौकट ह्या बैठकीवर विविध उपसंस्कृती टिकून राहतील आणि तरीही त्यामुळे एकतेला तडा जाणार नाही, असे विधान अयोग्य ठरू नये.

विविधतेमधील एकता ही संस्कृतीच्या यशाचा व मानवतेच्या उदात्ततेच्या परमोच्च बिंदू मानला जातो. अर्थात, एकता केवळ देशापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर आली तर तो परमोच्च बिंदू मानणे खरोखर योग्य ठरेल.

संस्कृतीच्या अनेक क्षेत्रांमध्ये विविधता असूनही, अमेरिकेमध्ये सर्वसाधारणपणे सामाजिक एकता जाणवत असली तरी अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक ह्यांच्यात अजिबात मानसिक तणाव नाही, असे सरसकट विधान करणे अयोग्य ठरेल; ते स्वाभाविकसुद्धा नाही. परंतु, तुरळक व लहान प्रमाणातील अपवाद वगळता, अशा तणावाचा स्फोट सहसा होत नाही व एकतेचा भंग होत नाही आणि म्हणूनच सर्वांगीण उन्नती साधण्याच्या मार्गात अडथळे निर्माण होत नाहीत. अशातच झालेल्या आमच्या छोट्या गावातील सॉक्रेटिस कॅफेच्या (गावातील नागरिकांसाठी विविध विषयांवर अनौपचारिक चर्चा करण्याकरता उपलब्ध केलेल्या व्यासपीठाच्या) एका मासिक सभेत उपस्थित पंधरा सभासदांमध्ये झालेल्या चर्चेत अमेरिकेतील सध्याच्या लोकसंख्येतील वाढत्या विविधतेमुळे एकतेला बाधा येणार नाही ह्याबाबत एकमत झाले, ही बाब लाक्षणिक मानता येईल.

**विश्लेषण**

अमेरिकन समाजाच्या विविधतेमध्ये एकता कशी निर्माण झाली? अमेरिकेचा इतिहास, धर्मकारण, देशाची विकासाभिमुख यंत्रणा, व्यापारी वृत्तीतून साधलेली आर्थिक उन्नती आणि ज्ञानप्रकाशित विचारसरणीचा (एनलाईटनमेंटचा) समाजाच्या मानसिकतेवर पडलेला प्रभाव ह्या बाबी अमेरिकेत अनुभवास येणाऱ्या सामाजिक एकतेशी संबंधित आहेत.

- इतिहास

अमेरिकेचा इतिहास एकतेला प्रतिकूल नाही. एक तर, मानवी इतिहासाचा कालखंड इंग्रजांनी अमेरिकेत वसाहतीला प्रारंभ केल्यापासून जेमतेम ४०० वर्षांचा आहे, त्यामुळे अमेरिकेत प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडाबरोबर येणाऱ्या, रुजणाऱ्या समस्या नाहीत. दुसरे म्हणजे, बहुसंख्य अमेरिकन व्यक्ती त्यांच्या इतिहासाच्या प्रारंभापासून एकाच संस्कृतीच्या व धर्माच्या, म्हणजे पाश्चात्त्य संस्कृतीच्या व खिश्चन धर्माच्या अनुयायी आहेत. त्यामुळे धार्मिक व सांस्कृतिक संघर्ष उद्‌भवले नाहीत. ह्या संदर्भात सुरुवातीला व्यक्त झालेल्या वसाहतकारांच्या मानसिकतेलासुद्धा महत्त्व प्राप्त होते, ती म्हणजे 'अज्ञात देशात स्थायिक होताना सर्वजण त्यांची विविधता शाबूत ठेवून एकतेने राहतात.'

- धर्म

नवीन देशात स्थायिक होताना येणारी अनेक संकटे, अडचणी व वेळोवेळी जीवाला धोका पोचवणारे प्रसंग ह्यांच्यात धार्मिक संघर्षाची भर न घालता एकतेने त्यांना तोंड देणे सतराव्या शतकातील वसाहतकारांना आवश्यक होते. शिवाय, धार्मिक स्वातंत्र्याकरता हे मूळचे वसाहतकार अमेरिकेत आलेले असल्याने इतर वसाहतकारांच्या धर्म-पंथाबद्दल समंजसपणा व 'त्यांनादेखील त्यांचा धर्म पाळण्याचे स्वातंत्र्य आहे' ह्या तत्त्वाच्या गरजेची त्यांना जाणीव होती. तीच परंपरा प्रत्येक लाटेबरोबर आलेल्या वसाहतकारांनी चालू ठेवली व म्हणून धार्मिक विविधता एकतेच्या आड आली नाही.

- व्यापार वृद्धी व नवसंपत्तिनिर्मिती

इ.स. १६२० च्या सुमारास जेव्हा अमेरिकेत वसाहत प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली त्या सुमारास व्यापारातील वृद्धीकरता फायद्यातील सातत्याच्या दूरगामी दृष्टिकोनातून येणारी सामाजिक विश्वासार्हता आणि व्यापारी वृत्ती - म्हणजेच कामसूपणा, परस्पर-विश्वास (म्युच्युअल ट्रस्ट), सौजन्यशील वागणूक व व्यवहारज्ञान हे गुण -युरोपमध्ये रुजली होती. अमेरिकेत वसाहत करायला आलेले युरोपीय हा गुणसमुच्चय आपल्याबरोबर घेऊन आले, असे विधान करणे अयोग्य ठरणार नाही. ह्या ठिकाणी हे नमूद करू इच्छितो की वर उल्लेख केलेले सर्व गुण सामाजिक एकता प्रस्थापित करण्याकरिता अनुकूल ठरतात - किंबहुना आवश्यक असतात.

व्यापारी वृत्ती व त्यानंतर प्रस्थापित झालेल्या औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेले विचार अमेरिकेत वसाहतीच्या सुरुवातीच्या काळातच येऊन पोचले. अमेरिकनांनी ते स्वप्रयत्नांनी अधिक विकसित केले. त्याबरोबरच अठराव्या शतकातील ज्ञानप्रकाशित विचारसरणीमधील (एनलाईटनमेंट) उदारमतवाद व मानवतावाद ह्या शिकवणींचा अमेरिकनांवर प्रभाव पडू लागला होता. ह्या साऱ्या घटनांमुळे अमेरिकेत व्यापार उदिमावर लक्ष केंद्रित झाले व लक्षणीय प्रमाणात नवसंपत्ती निर्माण होऊ लागली.

● विषमता

प्रारंभापासूनच (गुलामांना वगळले तर) इतर देशांच्या तुलनेत आर्थिक विषमता व दारिद्र्य अमेरिकेत कमी होते. जोडीला, लक्षणीय प्रमाणात नवसंपत्ती निर्माण होऊ लागली आणि जोडीने बऱ्याच प्रमाणात नवसंपत्तीचा योग्य वापर समाजकल्याणाकरता होण्यासाठी कायदे झाले. त्यामुळे, आर्थिक विषमता जरी वाढली तरी प्रत्येकाला प्रतिष्ठेने जीवन जगण्याकरता आवश्यक असणारी व्यवस्था निर्माण झाली. अशा कायदेशीर व्यवस्थांची काही उदाहरणे म्हणजे विनामूल्य शालेय शिक्षण, सर्वांना समान संधी - ॲफर्मेटिव्ह ॲक्शन, गरजू व्यक्तींकरता माफक किमतींची वा भाड्याची घरे -प्रत्येक गावाच्या नगरपालिकेने अशी घरे उपलब्ध करायला हवीत असा कायदा, गृहहीनांना निवारा देणारी ठिकाणे, निराधार व्यक्तींना शासनातर्फे नियमितपणे देण्यात येणारी आर्थिक मदत. ह्या सर्व सुधारणांमुळे एक तर आर्थिक विषमतेची बोच कमी झाली व गरजूंकरता एक प्रकारची आर्थिक सुरक्षिततासुद्धा (सेफ्टी नेट) निर्माण झाली.

● शिक्षणाचा प्रसार

अमेरिकेच्या स्थापनेपासून सर्वांना उपलब्ध असलेले शालेय शिक्षण ही एक महत्त्वाची बाब आहे. अमेरिकेत व इतर विकसित पाश्चात्त्य देशांमध्ये शालेय शिक्षण विनामूल्य व सक्तीचे आहे. सुमारे ६० टक्के विद्यार्थी शालेय शिक्षण संपल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणाला प्रारंभ करतात. जोडीला, झालेले एनलाईटनमेंटचे संस्कार. बहुसंख्य समाज केवळ साक्षर नव्हे तर शिक्षित असल्यामुळे सामाजिक प्रश्नांच्या नैतिक व व्यावहारिक महत्त्वाचे परिणामकारक आकलन होणे समाजाला शक्य झाले व त्यामुळे एकतेच्या दिशेने नेणाऱ्या व सर्वांना संधी प्राप्त करून देणाऱ्या सुधारणा अधिक सुलभतेने व वेगाने रुजल्या; जागरूक समाजाच्या ह्या गरजा पूर्ण करणे शासनाला, एक प्रकारे, अनिवार्य होते.

● भाषा

फक्त इंग्रजीतूनच शिक्षण देण्यात आल्यामुळे वसाहतकारांची मूळची मातृभाषा कोणतीही असली तरी त्यांच्या पुढच्या पिढ्या इंग्रजी भाषिक झाल्या. त्यामुळे, समाजातील सर्वांना एक भाषा अवगत असणे व तिचा व्यवहारात व विविध सामाजिक स्तरांमधील संभाषणात सातत्याने उपयोग करणे अमेरिकेसारख्या विशाल प्रदेशात शक्य झाले; भाषिक एकता सामाजिक एकतेला पोषक ठरते व ठरली.

● शासकीय यंत्रणा

अमेरिकेच्या राजकीय व सामाजिक इतिहासातील व आजच्या परिस्थितीच्या विश्लेषणातून असे नजरेस येते की, विविधतेत एकता साधण्याकरता अमेरिकन यंत्रणेतील पुढील गोष्टी विशेष कारणीभूत ठरल्या;

★ सर्वांगीण उन्नतीची उद्दिष्टे - राजकीय व सामाजिक,

★ त्या उद्दिष्टांकडे वाटचाल होण्यासाठी शिक्षण - प्रशिक्षण,

★ शिक्षण - प्रशिक्षणातून समाजाचे, नागरिकांचे क्षमतावर्धन, आणि

★ विकासासाठी समान संधींची उपलब्धता.

## समारोप

ऐतिहासिक पार्श्वभूमी अमेरिकेतील एकतेला प्रतिकूल नव्हती. अमेरिकेतील एकता एकमेकांशी सौजन्याशील वागणूक, एकमेकांवर विश्वास, संवेदनशीलता, सर्वांना इंग्रजी भाषेचे असलेले ज्ञान आणि नवसंपत्तीनिर्मिती ह्यांच्याशी संबंधित आहे. झालेल्या भरभराटीमुळे आर्थिक विषमता जरी वाढली तरी प्रत्येकाला प्रतिष्ठेने जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी व्यवस्था निर्माण करण्यास साहाय्य झाले. ह्या सर्व गोष्टींमुळे धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक किंवा भाषिक विविधता असूनही सामाजिक व आर्थिक क्षेत्रांमध्ये एकतेचे वातावरण निर्माण झाले व राजकीय क्षेत्रातदेखील समंजसपणा रुजू लागला.

सामाजिक नेतृत्वाला, व म्हणून शासकीय यंत्रणेला, आधुनिक काळात गरजेच्या असलेल्या 'धर्म व राजकारण ह्यांतील द्वैत' ह्या तत्त्वाचे आकलन झाल्यामुळे अमेरिकेतील यंत्रणेने विकासावर भर दिला. सकारात्मक यंत्रणेने साधलेला शिक्षणाचा प्रसार आणि आर्थिक उन्नती व सुरक्षा ह्या गोष्टींमुळे समाजातील वाढत जाणारे मध्यमवर्गाचे प्रमाण अमेरिकेत अनुभवास येणारी 'विविधतेतील एकता' पुढेही टिकवून ठेवण्यास मदतच करेल.

## तात्पर्य

★ समाज व राष्ट्र ह्यांच्या प्रगती आणि विकासाकरता सामाजिक एकता आवश्यक असते.

★ प्रतिकूल असणाऱ्या वा वाटणाऱ्या ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या गुंत्यातून सुटका करून घेणे एकतेसाठी आवश्यक आहे.

---

**- डॉ. विजय जोशी,**
वेस्ट विंडसर, न्यू जर्सी, यू.एस.ए.
E-mail : vajsn@hotmail.com